# विद्या प्रसारक मंडळ, ठाणे

| | | |
|---|---|---|
| मासिकाचे नाव | : | दिशा |
| कार्यकारी संपादक | : | श्री. मोहन पाठक |
| प्रकाशक | : | विद्या प्रसारक मंडळ |
| प्रकाशन वर्ष | : | २००३ |
| वर्ष | : | तिसरे |
| अंक | : | १२ |
| पृष्ठे | : | ४० पृष्ठे |


**गणपत्रिका विद्या प्रसारक मंडळाच्या "ग्रंथालय" प्रकल्पांतर्गत निर्मिती**

**गणपत्रिका निर्मिती वर्ष : २०१०**

**गणपत्रिका क्रमांक : ७५**

MAHMAR 19358/11/1/2000-TC

विद्या प्रसारक मंडळ
ठाणे



व्ही. पी. एम्.

# दिशा

वर्ष तिसरे / अंक १२ / नोव्हेंबर २००३

## संपादकीय

## गती हवी... पण किती हवी....?

कुडावळे या कोकणातल्या छोट्याशा गावातून 'निसर्गायन' हा बहुमोल ग्रंथ लिहिणारे व एकेकाळी विवेकानंद केंद्राचे काम पहाणारे पर्यावरणाची खरी जाणीव असणारे कार्यकर्ते दिलीप कुलकर्णी गतिमान संतुलन या नावाचे केवळ चारसहा पानांचे मासिक काढतात. मासिकात अर्थातच पर्यावरणविषयक मूलभूत समस्यांबाबत विचार करणारे लेखन असते. थेट मातीशी नातं असणाऱ्या या मासिकाच्या २३ सप्टेंबरच्या अंकात मुख्य पानाच्यावर एक चिंतनिका त्यांनी दिली आहे. यात क्रूस कोलमन या विचारवंताचा विचार आहे. तो असा - ''मोटारगाड्यांच्या अंतर्गत ज्वलन' पद्धतीच्या इंजिनात कितीही बदल, सुधारणा होवोत, मानवी पावलांपेक्षा अधिक समुचित अभियांत्रिकी किंवा सायकलपेक्षा अधिक कुशल तंत्रज्ञान असंभव आहे.'' या अंकाचा संदर्भ संपादकीयात देण्याचा उद्देश पहिली मोटार बनविली गेली, तिला ऑक्टोबर २००३ मध्ये १०० वर्षे झाली, या निमित्ताने श्री. कुलकर्णी यांनी लिहिलेले 'संतुलन ढळवणारी गती' हे संपादकीय !

या लेखात श्री. कुलकर्णी यांनी एक मूलगामी प्रश्न निर्माण केला आहे. १०० वर्षांत पुलाखालून इतकं पाणी वाहून गेलं की फोर्ड कंपनीची पहिली मोटार ऑक्टोबर १९०३ मध्ये रस्त्यावर धावली हा इतिहासही पुसला गेला. श्री. कुलकर्णी या लेखात लिहितात, 'मुळात इतकी वाहतूकच आवश्यक आहे का? गती आवश्यक आहे, पण इतकी गती आवश्यक आहे का? सारं संतुलन ढासळवणारी ही गती माणसाला पेलवते आहे का? अधिकाधिक मोठं, जटिल आणि महाग होत जाणारं तंत्रज्ञान माणसाच्या आवाक्यात रहाते आहे का?

हा लेख वाचल्यावर अनेकानेक कारणांनी व्हेइकल अॅडिक्ट किंवा स्पीड अॅडिक्ट असलेल्या आपल्या अगातले खूप प्रश्न डोळ्यासमोर फेर धरून नाचू लागले. रस्त्यावरून चालता चालता मागून येणाऱ्या वहानाची धडक लागून 'ऑन द स्पॉट' गेलेला कोणीतरी, सुसाट वेगाने निघून गेलेलं वहान, दारूबरोबरच गतीची नशा चढून मोठाले अपघात होण्यास कारणीभूत ठरणारे चालक, मोटार दरवर्षी बदलणारे धनिक.. एक ना अनेक. याशिवाय मोठी गाडी घेऊन एकच माणूस रस्त्यातून जातो, ट्रॅफिक जामच्या चक्रात.. एकट्यासाठी इतकी जागा व्यापतो, तेव्हा सार्वजनिक वाहतूक व्यवस्था दयनीय असते. असे कितीतरी विषय मनात पुन्हा पुन्हा येत राहिले. गती हवी हे नक्कीच, पण इतकीही गती नको की समाजाचे व आपले, आपण व घरात वाट पहाणारांचे सर्व प्रकारचे संतुलन बिघडवून टाकेल. या मोटार गाडींच्या शताब्दीच्या निमित्ताने आपण १०० वर्षातला मोटार गाडीचा प्रवास तपासून पहायला हवा, युद्धात गेले नसतील इतके जीव मोटार अपघातातून गेले असतील. अर्थात मोटार नको असे नाही, तर मोटार वापर तारतम्याने करायला हवा, स्पीडोमीटरचे भान ठेवायला हवे !

# व्ही. पी. एम्. दिशा

वर्ष तिसरे / अंक १२ / नोव्हेंबर २००३

**कार्यकारी संपादक**
प्रा. मोहन पाठक

**कार्यालय**
विद्या प्रसारक मंडळ
डॉ. बेडेकर विद्यामंदिर
नौपाडा, ठाणे - ४०० ६०२
दूरध्वनी : २५४२ ६२ ७०

**मुद्रण स्थळ :**
परफेक्ट प्रिन्टर्स,
नूरीबाबा दर्गा रोड, ठाणे.
दूरध्वनी : २५३४ १२ ९१
२५४१ ३५ ४६

## अनुक्रमणिका


| | | | |
|---|---|---|---|
| १) | ग्रंथालय चळवळीत कै. वि. स. पागे यांचे योगदान | प्रा. अशोक ठाकूर | ३ |
| २) | श्री नामदेव | श्री. शं. बा. मठ | ६ |
| ३) | विद्युत चुंबकीय लहरी आणि आपण | गीतेश ग. शिंदे | १५ |
| ४) | खाजगी कोचिंग क्लासेस विरुद्ध शाळा- एक अघोषित युद्ध | श्री. प्रभाकर अरदकर | १७ |
| ५) | उपेक्षित ग्रंथ | वैशाली जोशी | २० |
| ६) | स्वच्छता | सौ. वंदना प्रसादे | २३ |
| ७ ) | सान्ताकडून अनंताकडे निघालेली 'पालखी' | सौ. आशा भिडे | २४ |
| ८) | बालसंगोपन या विषयावरील उपयुक्त पुस्तक 'आपलं बाळ' | मोहन पाठक | २८ |
| ८) | आर्थिक विकासाला राजकीय अडथळे | आदिती सं. सोमण | ३० |
| ९) | दूरदर्शनवरील दीर्घकालीन मालिका - वास्तव / अवास्तव | श्वेता द. डिचोलकर | ३२ |
| ९) | परिसरवार्ता | संकलित | ३५ |


या अंकात व्यक्त झालेली मते त्या लेखकांची वैयक्तिक मते असून त्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.

# ग्रंथालय चळवळीत कै. वि.स. पागे यांचे योगदान

*१४ ते २० नोव्हेंबर हा ग्रंथालय सप्ताह असतो. त्यानिमित्ताने मुद्दाम हा लेख देत आहोत. कै. वि. स. पागे यांचे ग्रंथालय प्रेम सुविख्यात होते. त्यांच्या या क्षेत्रातील योगदानाबद्दल.*

*- संपादक*

कै. वि.स.पागे यांनी महात्मा गांधी यांचा समर्थ वारसा घेतल्यामुळे तत्त्वज्ञान, राजकारण, समाजकारण आणि एकंदरीत अनेकविध सेवा क्षेत्रात सहभागी होऊन ती क्षेत्रे उजविण्याचा सापेक्षी प्रयत्न केला होता.

कै. पागे यांचे नाव मुख्यत: त्यांच्या 'रोजगार हमी योजने'मुळे आपल्या सर्वांच्या सदैव स्मरणात राहणार आहे. त्याचप्रमाणे त्यांनी ग्रंथालय चळवळीला दिलेल्या योगदानामुळे त्यांची स्मृती सार्वजनिक ग्रंथालय कार्यकर्त्यांच्या स्मरणात चिरंतन राहणार आहे.

कै. पागेंचा पिंड हा महात्मा गांधींच्या विचार प्रणालीवर नितांत आदर असलेला असल्याने त्यांची महाराष्ट्रातील सार्वजनिक ग्रंथालय चळवळ ही शासनाधिष्ठित न राहता ती सर्वसामान्य ग्रंथालय कार्यकर्त्यांच्या प्रयत्नांनी फलश्रुत व्हावी, अशी धारणा होती. त्यामुळे महाराष्ट्र शासनाने त्यांच्या अध्यक्षतेखाली नेमलेल्या 'महाराष्ट्र सार्वजनिक ग्रंथालय विधेयक' समितीने भारतातील व महाराष्ट्रांतील ग्रंथालय कार्यकर्त्यांच्या परिश्रमपूर्वक व व्यासंगरित्या राज्यभर बैठका घेऊन आणि अन्य राज्यांतील ग्रंथालय कायदा-अधिनियमांचा तपशीलवार अभ्यास करून हे विधेयक तयार केले.

भारतात १९३० ते १९३९ हा ग्रंथालय कायद्याचा आरंभ काल मानला जातो. डिसेंबर १९३० मध्ये बनारस येथे भरलेल्या 'अखिल आशिया शिक्षण परिषदे'त ग्रंथालय कायद्यावर परिसंवाद झाला होता. डॉ. एस्. आर. रंगनाथन् यांना ग्रंथालय सेवा विभागाचे सचिव म्हणून पाचारण करण्यात आले होते. भारतासाठी त्यांनी तेथे 'आदर्श ग्रंथालय विधेयक' मांडले. या विधेयकाचाही पागे समितीने अभ्यास केला होता. त्याचप्रमाणे ए. ए. फैजी समितीने सुचविलेल्या प्रादेशिक ग्रंथालये स्थापन करण्याच्या योजनेची अंमलबजावणी स्वातंत्र्य प्राप्तीनंतर म्हणजे १९४७ नंतर झाली. त्यानुसार १९४७ साली पूर्वीच्या अविभाज्य मुंबई राज्यासाठी डॉ. रंगनाथन् यांनी 'ग्रंथालय विकास योजना' व ग्रंथालय विधेयकाचा मसुदा तयार करून दिला होता त्याचाही परामर्श पागे समितीने महाराष्ट्र ग्रंथालय विधेयक तयार करताना घेतला आहे.

इ.स. १९४८ साल हे भारतात ग्रंथालय कायद्याचे दृष्टीने क्रांतिकारी ठरले. <u>भारतातील पहिल्या ग्रंथालय कायद्याची प्रत्यक्ष अंमलबजावणी १९५० मध्ये झाली.</u> १९५५ मध्ये डॉ. रंगनाथन् व श्री. उजळंबकर यांचे प्रयत्नाने 'हैद्राबाद सार्वजनिक ग्रंथालय कायदा' संमत झाला.

इ.स. १९५१ मध्ये महाराष्ट्र ग्रंथालय संघाचे अध्यक्ष आचार्य दादासाहेब दोंदे यांनी ग्रंथालय कायद्याचा मसुदा विधान सभेत मांडला होता. परंतु हे अनधिकृत विधेयक सार्वजनिक ग्रंथालय चळवळीसाठी पुरेसा निधी उपलब्ध होऊ शकणार नाही या मुद्यावर मुंबई विधान सभेने नामंजूर केले.

इ.स. १९५६ मध्ये आंध्र प्रदेश ग्रंथालय कायदा अस्तित्वात आला. १९६३ मध्ये डॉ. सेन समितीने हा मसुदा विविध राज्यात विचारार्थ पाठविला होता. १९६५ मध्ये कर्नाटक ग्रंथालय कायदा संमत झाला. त्यानंतर मात्र

महाराष्ट्रासाठी ग्रंथालय कायद्याची आवश्यकता सर्वच सार्वजनिक ग्रंथालय कार्यकर्त्यांना जाणवू लागली होती. डॉ. रंगनाथन् समितीने पुणे येथील महाराष्ट्र ग्रंथालय परिषदेच्या वेळी कायद्याच्या प्रश्नावर जनमत अजमावण्याच्या उद्देशाने हे पुस्तक डॉ. रंगनाथन् यांच्या शुभहस्ते प्रकाशित केले. यानंतर १९६५ च्या महाराष्ट्र राज्य ग्रंथालय परिषदेच्या रत्नागिरी येथील अधिवेशनात कायद्याची जोरदार मागणी करण्याचा विचार झाला आणि आजपर्यंतच्या या सर्व प्रयत्नांचे फलस्वरूप म्हणून महाराष्ट्र सरकारने कै. वि. स. पागे यांच्या अध्यक्षतेखाली महाराष्ट्रातील सार्वजनिक ग्रंथालयांच्या विकासासाठी 'महाराष्ट्र सार्वजनिक ग्रंथालय विधेयक' तयार करण्यासाठी समिती नेमली.

कै. पागेंनी भारतात व महाराष्ट्रात कार्यरत असलेल्या सर्व ग्रंथालयीन संघांबरोबर व कार्यकर्त्यांबरोबर विचार-विनिमय करून वेगवेगळ्या विभागात बैठका घेतल्या. पूर्वीचे अनुभव लक्षात घेऊन ग्रंथालय कार्यकर्त्यांबरोबर चर्चा केल्या व महाराष्ट्र राज्याचा आदर्श असा ग्रंथालय कायदा तयार करण्यासाठी ग्रंथालय मसुद्यांची रचना तयार केली. कै. पागेंवर महात्मा गांधींच्या विचारसरणीचा प्रभाव असल्यामुळे ग्रंथालये ही ग्रंथालय कार्यकर्त्यांमधून निर्माण झाली पाहिजे अशी मनोधारणा होती. कोणत्याही सामाजिक चळवळीत सरकारी हस्तक्षेप होतो त्यावेळी ती चळवळ यशस्वी होण्यात अनेक अडचणी येतात असे त्यांचे प्रांजळ मत होते. त्यामुळे ग्रंथालय कायद्याचा मसुदा तयार करताना या सर्व गोष्टींचा त्यांनी साकल्याने विचार केला होता.

कै. पागेंचे सर्व आमदारांबरोबर व विरोधी पक्ष नेत्यांबरोबर सौहार्दपूर्ण संबंध होते. त्यामुळे पागे समितीने विधान सभेत मांडलेले 'महाराष्ट्र सार्वजनिक ग्रंथालय विधेयक' एकमताने मंजूर करण्यात आले. १९५० पासून आजपर्यंत मंजूर झालेल्या विधेयकांपैकी एकमताने मंजूर झालेले ते पहिलेच विधेयक होते. स्वातंत्र्य प्राप्तीनंतर जवळ जवळ २० वर्षांनंतर ग्रंथालय कायदा महाराष्ट्रात अस्तित्वात आला. त्याची प्रत्यक्ष अंमलबजावणी १ मे १९६८ पासून झाली याचे सर्व श्रेय जनमानसात तसेच सार्वजनिक क्षेत्रात व राजकीय क्षेत्रात कै. पागेंच्या निःस्पृहपणे काम करण्याच्या वृत्तीकडे जाते. कै. पागे हाती घेतलेले कोणतेही काम अभ्यासपूर्ण तयारी करून ते पूर्णत्वाला नेत असत याची प्रचिती याही वेळी सर्व ग्रंथालय प्रेमी कार्यकर्त्यांना आली.

कै. पागेंनी महाराष्ट्र सार्वजनिक ग्रंथालय कायद्यात तामिळनाडू व कर्नाटक राज्यांच्या ग्रंथालय कायद्यापेक्षा विशेष क्रांतिकारी बदल सुचविले. त्यामुळे महाराष्ट्रातील ग्रंथालय चळवळीला नवचैतन्य प्राप्त झाले. कै. पागे समितीने तयार केलेल्या अधिनियमांची खालील प्रमुख वैशिष्ट्ये आहेत.

१) महाराष्ट्र ग्रंथालय कायद्याचे स्वरूप इतर राज्यातील ग्रंथालय कायद्यापेक्षा वेगळे आहे. महाराष्ट्रातील सार्वजनिक ग्रंथालयांची स्वायत्तता या कायद्याने कायम ठेवली आहे. सार्वजनिक ग्रंथालये ही जनतेच्या सेवेसाठी आहेत आणि ती स्थानिक लोकांनीच चालवावीत हे तत्त्व मान्य करण्यात आले आहे. या सर्व सार्वजनिक ग्रंथालयांना पोषक असे काम करण्यासाठी राज्यात एक राज्य मध्यवर्ती ग्रंथालय आणि प्रत्येक विभागात एक विभागीय ग्रंथालय शासनातर्फे चालविले जावे अशी कायद्यात तरतूद आहे.

२) 'राज्य ग्रंथालय परिषद' हे या कायद्याचे दुसरे महत्वाचे वैशिष्ट्य आहे. राज्य सरकारला ग्रंथालयांच्या विकासासंबंधी सर्व बाबतीत सल्ला देणे हे या परिषदेचे कार्य असून, परिषदेचे बहुसंख्य सदस्य हे बिनसरकारी आहेत. प्रत्येक जिल्ह्यासाठी एक जिल्हा ग्रंथालय समिती स्थापन करण्याची तरतूद या कायद्यात आहे.

३) 'कर नाही' हे या कायद्याचे महत्वाचे वैशिष्ट्य आहे. सामान्यतः ग्रंथालय कायद्यामध्ये ग्रंथालय कराची

तरतुद असते. परंतु स्वतंत्र ग्रंथालय कर न बसविता सार्वजनिक ग्रंथालयासाठी निश्चित स्वरूपाचा निधी उपलब्ध करून देणारा महाराष्ट्र सार्वजनिक ग्रंथालय कायदा हा पहिलाच कायदा आहे. प्रतिवर्षी '२५ लाखापेक्षा कमी नाही' इतकी तरतुद कायद्याने केली आहे. आज सुमारे १५ कोटी रुपयांचा ग्रंथालय विभागाचा अर्थसंकल्प आहे.

४) स्वतंत्र ग्रंथालय संचालनालयाची निर्मिती हे या कायद्याचे आणखी एक वैशिष्ट आहे. कायदा अस्तित्वात येण्यापूर्वी सार्वजनिक ग्रंथालयांची व्यवस्था ग्रंथालय अभिरक्षकाकडे (क्युरेटर ऑफ लायब्ररीज) होती व ग्रंथालय अभिरक्षक हे शिक्षण संचालकाच्या देखरेखीखाली काम करीत होते. दि. १ मे १९६८ रोजी स्वतंत्र ग्रंथालय संचालनालयाची निर्मिती झाली व ग्रंथालय संचालक यांना या विभागाचे प्रमुख नेमण्यात आले. स्वतंत्र ग्रंथालय संचालनालयाच्या स्थापनेमुळे साहजिकच सार्वजनिक ग्रंथालयांच्या वाढील वेग प्राप्त झाला. १९६८ मध्ये ४७४ सार्वजनिक ग्रंथालये होती. आज एक मुख्य मध्यवर्ती ग्रंथालय असून ६७ विभागीय ग्रंथालये, १७ शासकीय जिल्हा ग्रंथालये, खाजगी व्यक्ती व संस्थेकडून चालविली जाणारी अ, ब, क व ड या चार दर्जाची सुमारे ६०११ सार्वजनिक ग्रंथालये आहेत. सार्वजनिक ग्रंथालये शासनमान्य असून, संचालनालय यांच्या विविध योजनेनुसार त्यांना अनुदानाचा लाभ मिळतो.

५) सार्वजनिक ग्रंथालयाच्या सेवक व कार्यकर्ते यांना ग्रंथालय शास्त्राचे ज्ञान व्हावे यासाठी प्रशिक्षण देण्याची तरतूद या कायद्यात आहे.

अशा प्रकारे कै. पागेंनी 'महाराष्ट्र सार्वजनिक ग्रंथालय कायदा' वैशिष्टपूर्ण कलमांनी परिपूर्ण करून महाराष्ट्रातील ग्रंथालय चळवळीला मोठे योगदान दिले आहे. खेड्यापर्यंत ग्रंथालय सेवा पोहचली पाहिजे. 'गाव तेथे ग्रंथालय' ही संकल्पना प्रत्यक्षात साकार झाली पाहिजे. ग्रंथालये आर्थिकदृष्ट्या सक्षम झाली तरच ग्रंथालय कार्यकर्त्यांना सार्वजनिक ग्रंथालये चालविणे शक्य होईल याची पागेंना जाणीव होती त्यामुळे शासनाने कायदा अस्तित्वात आल्यानंतर वेळोवेळी नेमलेल्या ग्रंथालय समितीवर काम करून आपले ग्रंथालय चळवळीला योगदान देऊन ती चळवळ पुढे नेण्याचा नेहमीच त्यांनी प्रयत्न केला असल्याचे दिसून येते.

कै. वि. स. पागे यांनी आपल्या जीवनात भोगापेक्षा योगाला, प्रतिष्ठेपेक्षा निष्ठेला, विलासापेक्षा विकासाला, प्रसिद्धीपेक्षा सिद्धीला, साधनांपेक्षा साधनेला आणि सत्तेपेक्षा सत्याला अधिक महत्त्व दिले. महाराष्ट्र विधानपरिषदेचे माजी सभापती, रोजगार हमी योजनेचे शिल्पकार ही कै. पागेसाहेबांची ओळख खरी असली तरी महाराष्ट्रात ग्रंथालयांचा विकास व्हावा, खेडोपाडी ग्रंथालये लोकांच्या चळवळीतून व्हावीत म्हणून त्यांनी विविध पातळ्यांवर केलेले अथक प्रयत्न महाराष्ट्रातील ग्रंथालय चळवळीला नेहमीच मार्गदर्शक व पूरक ठरले आहेत त्यामुळे ग्रंथालय चळवळीतील कार्यकर्त्यांना ते नेहमी 'ग्रंथालय प्रेमी' म्हणून सदैव स्मरणात राहणार आहेत.

प्रा. अशोक ठाकूर
ग्रंथपाल,
पालघर महाविद्यालय,
पालघर, जि. ठाणे.

•••

# श्री नामदेव

*कार्तिक वद्य एकादशी ही संत शिरोमणी नामदेव महाराजांची जन्मतिथी. त्या निमित्ताने त्यांचे स्मरण असणारा हा माहितीपूर्ण लेख. - संपादक*

## महाराष्ट्रीय संत -

भारत हा संतांचा देश आहे. 'देव शिरी धरावा । अवघा हलकल्लोळ करावा.' समर्थांच्या या उक्तीप्रमाणे स्वधर्म, स्वभाषा आणि स्वराष्ट्र याना उजाळा देण्यासाठी संतांनी आसेतुहिमाचल प्रयत्न केले. जनसामान्यात ईश्वर जागृती केली. ईश्वरी कार्यासाठी त्यांना उद्युक्त केले. ईश्वरी कार्य म्हणजे काय याची स्पष्ट कल्पना दिली. सज्जनतेचे पालन, दुष्ट प्रवृत्तींचे निर्दालन आणि स्वधर्माची प्रतिष्ठापना केली. 'परित्राणाय साधूनां विनाशायच दुष्कृताम् । धर्म संस्थापनार्थाय संभवामि युगे युगे ।' (गीता) भगवंताच्या या वचनाचे लोण संतांनी संपूर्ण महाराष्ट्रात पोहोचवले. संतानी सद्भावनेचे एकोप्याने शिक्षण येथील जनतेला दिले. त्यासाठी आध्यात्मिक बैठक स्वीकारली. त्यांची विचारसरणी उच्च व उदात्त केली. आपल्या विपुल साहित्याने कवन, अभंग, दोहे, भारूड इत्यादि माध्यमाने अगदी सामान्य माणसापर्यंत आपली शिकवण पोचविण्याचा संतांनी प्रयास केला.



भक्तीची बीजे या भरतभूमीत अनादी काळापासून रुजलेली आहेत. ऋग्वेदातील वसिष्ठकृत वरुण प्रार्थनेत याची बीजे आढळतात. भक्तिगुणांचा विलास पुरातन आहे. भक्तीचा पहिला पाठ खुद्द भगवान् श्रीकृष्णानी सर्व समाजाला दिला. स्त्रियो वैश्या: तथा शूद्रा: तेऽपि यांति परांगतिम् । (गीता) स्त्री, वैश्य, शूद्र आदि भक्तिद्वार महत् पद प्राप्त करून घेऊ शकतात. उत्कट भक्तिभावाच्या सरितेत कुणीही स्नान करावे व उद्धरून जावे असे वाहीरपणे सांगून भक्तीचा झेंडा प्रथम भगवंतानीच उभारला तोच पुढे भागवतानी महाराष्ट्रभूमीत पंढरीच्या वाळवंटावर नाचविला. महाराष्ट्रीय संतांची उत्कट ईश्वरभक्ती, त्यांचा जाज्वल्य स्वभावाभिमान, शिवाशिवीच्या, जातिभेदांचे बंड मोडण्यासाठी त्यानी उभारलेला झेंडा व बांधलेले कंकण अगदी दलितापासून ते विद्वानापर्यंत सर्वांनाच मोक्षाचे अधिकारी बनविण्याचे व्रत, एकाच प्रभूचे आपण सारे लेकरे अशी शिकवण देऊन महाराष्ट्र धर्माची प्राणप्रतिष्ठा करण्यासाठी भागवत धर्माचा पाया घातला. भक्तीचा उन्मादी पदार्थ संतांनी सर्वांना चाटला. त्यातून देहबुद्धी हरपून टाकली. देहावरील आसक्ती आपल्या अमोघ वाणीने संतानी उडवून दिली व सर्वांना भक्तीने भारून टाकले. चहुवर्णांसि नामाधिकार । नामी नाही लहान थोर । जडमूढ पैलपार । पावती नामे ॥ अशी शिकवण देत ते अगदी गरीबांच्या झोपडीपर्यंत जाऊन पोहोचले.

संतांनी सर्वांच्या अंत:करणात ईश्वरनिष्ठा निर्माण केली. आपल्या समर्थवाणीने संपूर्ण महाराष्ट्र खडबडून जागा केला. स्वधर्म व महाराष्ट्र या बद्दलचा अभिमान बाळगणाऱ्या शिवछत्रपतींना स्वराज्याची मुहूर्तमेढ रोवता येणे शक्य झाले आणि त्याचे दृश्य फळ म्हणजेच 'हिंदवी स्वराज्य' होय.

ज्ञानेश्वरांनी महाराष्ट्रात या भक्तीची ज्योत प्रथम उजळविली आणि तिचा प्रकाश अगदी गरीबाच्या झोपडीत पोचावा म्हणून त्यांनी ती ज्योत इतर संतांच्या हाती दिली. नामदेवांनी ती ज्योत पंजाबपर्यंत नेली. अशा तऱ्हेने ज्ञानदेवांनी घातलेल्या भक्ति मंदिराच्या पायावर जी इमारत उठली तिच्यावर तुकोबारायांनी कळस चढविला.

संत नामदेव होऊन गेल्याला सातवे शतक उलटून गेले. त्यांची कीर्ती व स्मृती अद्याप भारतीयांच्या अंत:करणात ताजी आहे. नामदेव वारकरी पंथाचे अग्रणी प्रचारक होते तसेच त्यांनी मानवधर्माचा हिरीरीने पुरस्कार केला. त्यांनी अखिल भारतात भक्ती आणि धर्म यांचा प्रचार करून भारतीय ऐक्याचे थोर कार्य केले. महाराष्ट्राच्या भौगोलिक सीमा ओलांडून - गुजरात, मध्य प्रदेश, राजस्थान, पंजाब, हरियाणा, उत्तर प्रदेश आदि प्रांतात अनेक वेळा पदयात्रा केली. जेथे जात तेथे नामदेव तेथील भाषा शिकत व तेथील लोक जीवनाशी समरस होत. भारतीय जन सामान्यात समता व एकात्मता प्रस्थापित करण्याचे महान् प्रयत्न नामदेवांनी १२ व्या शतकात केले.

**राजकीय परिस्थिती -**

मुबारक शहा खिलजी याने यादवांचे राज्य खालसा केले. दक्षिणेतील एका वैभवशाली हिंदू राजाचा अस्त झाला. महंमद तुघलक याने काही काळ देवगिरीलाच तळ ठोकून आपली राजधानी केली. मुसलमानी राज्यसत्तेचे केंद्र बनविले. या एकंदर घटनेमुळे हिंदू संस्कृतीवर प्रचंड आघात झाला. याचवेळी तुंगभद्रा तीरावर कर्नाटकात विजयनगर साम्राज्य उदयाला आले. हुक्क व बुक्क असे दोन शूर राजे झाले. कन्याकुमारीपर्यंत त्यांच्या राज्याचा विस्तार होता. नामदेव काळी अशी परिस्थिती होती.

**सामाजिक स्थिती -**

त्याकाळी समाज जीवन पूर्णत: धर्म प्रधान होते. कर्मकांड व रूढीचे फार मोठे प्राबल्य होते. धर्मनियमांना सामाजिक प्रतिष्ठा प्राप्त झालेली होती. त्यात बदल करणे पाप मानले जाई. धर्माच्या नियमाचे उल्लंघन झाल्यास प्रायश्चित घ्यावे लागे. प्रसंगी देहान्त प्रायश्चित घ्यावे लागे. तसेच सामाजिक बहिष्कारांना तोंड द्यावे लागे. सर्व धार्मिक संस्कार ब्राह्मणच करीत. वर्ण जन्मजात ठरविले गेले होते. जाती पण जन्मजात रूढ झाल्या. यामुळे समाजात रोटी बेटी व्यवहार मर्यादित झाले. भेदाच्या भिंती उभ्या राहिल्या. अस्पृश्यांना समाजात मान व स्थान नाहीसे झाले.

आद्य शंकराचार्यांनी पंचायतन पूजा रूढ केली असतानाही देवतावाद विकोपाला गेले होते. धार्मिकदृष्ट्या हिंदू विस्कळित झाल्यामुळे दुबळा झाला. व्रत वैकल्यांना ऊत आला. स्त्रियांवर बरीच बंधने होती. अंगारा, धुपारा, नवस आदी म्हणजे धर्म अशी भोळी समजूत होती. यामुळे बुवाबाजी फोफावली. अनेक संप्रदाय होते. रामानुजांचा वैष्णव संप्रदाय, नाथ संप्रदाय, महानुभव संप्रदाय हे प्रचलित होते. तसेच बसव राज यांचा वीर शैव संप्रदाय बराच प्रभावी होता. अशा सामाजिक, राजकीय पार्श्वभूमीवर नामदेवांनी कार्य केले व आपल्या कार्याचा ठसा उमटविला.

**जन्म व बालपण -**

आवंढ्या नागनाथापासून आठ-दहा कोसावर हिंगोली तालुक्यातील नरसी-बामणी या गावी श्रीनामदेवांचे पूर्वज राहात होते. नामदेवांचे मूळ पुरुष यदु शेट. ते शिंप्याचा व्यवसाय करीत. आषाढी व कार्तिकी पंढरीची वारी नियमित करीत. यदूचा मुलगा हरी शेट त्याचा मुलगा गोपाळ. याला दोन अपत्ये - गोविंद व राघव. गोविंद शेटला दोन मुलगे शिवाजी व नरहरी. नरहरी हे नामदेवांचे आजोबा. नरहरींचा मुलगा दामा शेट याचे लग्न गोणाईशी झाले. नरसी गावी असताना दामा शेटला आऊबाई नावाची मुलगी झाली. मुलगा नाही म्हणून शके ११८० ला पंढरपूरला जाऊन तेथेच कायमचे वास्तव्य केले. त्यांनी पुत्रप्राप्तीसाठी पांडुरंगाचे

नवस केले -

आदि ठाणे पंढरपूर । नावे कान्हाई सुंदर ।
गोणाईने नवस केला ।

देवा पुत्र देई मला । शुद्ध देखोनिया भाव ।
पोटी आले नामदेव । दामा शेटी हरुषला ।

दासी जनीस आनंद झाला । (जनाबाई अभंग)

दुसरा उल्लेख

द्वारकेहूनी विठू पंढरिये आला ।
नामयाचा पूर्वज दामा शेटी वहिला ।

दामा आणि गोणाई नवसी विठूसी ।
पुत्र देई आम्हा देवा भक्तराशी ।

तोचि नामदेव जन्मे शिंपियाच्या कुळी ।
भक्ताने पाहुनी वेधला तनमाळी।

एका जनार्दनी परंपरा कथियेली ।
धन्यधन्य विठू अनाथांची माऊली (एकनाथ महाराज)।

शेवटी त्यांना एक मुलगा झाला. शके ११९२ प्रमोदनाव संवत्सर कार्तिक शुक्ल ११ रविवार (दि. २६-१०-१२७०) सूर्योदयास नामदेवाचा जन्म झाला. नामदेव अभंगात लिहितात -

अधिक व्याण्णव गणितं अकरा शते । उगवता आदित्य ते जोराशी

शुक्ल एकादशी कार्तिकी रविवारी । प्रमोद संवत्सरी शालिवाहन शक ।

महिपतीने संत चरित्र मालिकेत वेगळीच आख्यायिका सांगितली आहे. दामा शेट भीमातीरी उभे असता एक शिंपला वहात आला तो त्याने घेतला. त्यात एक नवजात बालक प्रगट झाले. तेच नामदेव. हा कथाभाग कोणी विचारात घेतलेला नाही.

नामदेव शिंपी कुळातले. ते अभंगात म्हणतात -

शिंपियाचे कुळी जन्म माझा जाला ।
परि हेतु गुंतला सदाशिवी

रात्री माजी सिवीं दिवसा सिवी ।
आटणुक जीवी नोहे कदा।

सुई आणि सुतळी कात्री गज दोरा ।
मांडिला पसारा सदाशिवी

नामा म्हणे सिवी विठोबाची अंगी ।
म्हणोनिया जगी धन्य झालो ।

गृह जीवन -

घराण्यात पूर्वांपार विठ्ठल भक्ती. नामदेव लहानपणापासूनच विठ्ठलाचे मंत्र जपू लागला. एकदा दामा शेटी बाहेर गावी गेले. जाताना विठ्ठलाची रोजची पूजा नामदेवाकडे सोपविली. नामदेवाने पूजा केली व नैवेद्य खाण्याचा देवाला आग्रह करू लागले. पायावर डोके आपटून जीव देण्याची धमकी दिली. विठ्ठलाने नैवेद्य खाल्ला. ही घटना चमत्कारपूर्ण आहे. नामदेवांची दृढभक्ती व ईश्वरावर श्रद्धा हीच अभिव्यक्ती या गोष्टीवरून होते. हा बालभक्त सदा विठ्ठल भक्तीत दंग झालेला पाहून आई-वडिलांना काळजी वाटू लागली. संसाराकडे लक्ष लागावे म्हणून त्यांचे लग्न लहानपणीच करून टाकले. नामदेवाना चार मुलगे व एक मुलगी झाली. त्यांचे कुटुंब मोठे होते ते अभंगात म्हणतात -

गोणाई, राजाई सासू सुना ।
दामा नामा जाणा बाप लेक

नारा, विठा, गोंदा महादा चवघे पुत्र ।
जन्मले पवित्र त्यांचे वंशी ।

लाडाई, गोडाई, येसाई, साखराई ।
चवघी सुना पाही नामयाच्या ।

लिंबाई ती लेकी आऊबाई बहिणी ।
वेडी पिशी दासी त्याची जनी ।

एवढा मोठा संसार असून नामदेव विठ्ठल मंदिरात जाऊन बसत. त्याच्याशी हितगुज करत. एकदा त्याची वाट पाहून गोणाई मंदिरात गेली. तिथे त्याला हाताला धरून खेचले आणि म्हणाली, नामा नऊ महिने पोटात वाढवून तुला लहानाचा मोठा केला. तू या विठोबाचा नाद सोड. याने कधी कोणाचे बरे केले नाही. आपला संसार बुडवू नकोस. लौकिकाची चाड धर. काही पराक्रम कर. शिवण, टिपण कर. संसारासाठी काही कमाई कर. नामदेव ऐकत नाही असे पाहून तिने पांडुरंगाकडे मोर्चा वळविला. 'विठ्ठला आम्ही तुझी कधी आगळीक काढली नसताना माझ्या मुलाला तू वेडापिसा का करून टाकलेस? बऱ्या बोलाने माझे पोर माझ्या स्वाधीन कर. याच्या हातात भोपळा देऊन तू आम्हावर भिकेची पाळी आणलीस. कसली रे मेल्या तुझी दया? मी जीव देईन व नाम्याला नेईन हाच माझा निश्चय.' नामा म्हणाला आई मला पांडुरंगाच्या चरणापासून दूर ओढू नकोस. तुम्ही केवळ सुखाचे वाटेकरी. माझ्या दुःखाचे वाटेकरी कोण? म्हणूनच मी विठ्ठलाचे चरणी सर्वस्वी जीवन वाहिले आहे. आईने तरी विठ्ठलाची निंदा केली म्हणून नामदेव घरी आले. बायकोनेही त्याला उपदेश केला. ती म्हणाली तुम्ही देव जोडला व माझ्या संसाराचा नाश केलात. तुम्हाला माझी दया येत नाही काय? तरी नामदेव बधले नाहीत. शेवटी तिला पतीची आध्यात्मिक योग्यता कळली व टाकून बोलल्याचा तिला पश्चाताप झाला. ती म्हणते

मी तव अज्ञान न कळे महिमा ।
अपराध क्षमा करा माझा

अंतरीची खूण काही सांगा मज ।
जे तुम्ही बीज हृदयी धरूनी असा

जेणे सुखे तुमचे चित्त निरंतर ।
आनंदे निर्भर सदा असे ।

पुढे घरातली सर्व मंडळीच विठ्ठलाच्या भक्तीत रंगून गेली. हे नामदेवांच्या भक्तिभावाचे मोठे यश आहे.

**ज्ञानेश्वर भेट व गुरुपदेश -**

ही एक महत्त्वाची घटना मानावी लागेल. ही भेट चांगदेवांच्या भेटीनंतर झाल्याचा उल्लेख मिळतो. शके १२१२ कार्तिक महिन्यात भिंत चालवून तापी तीर निवासी सिद्ध चांगदेवांना ज्ञानोबा सामोरे गेले. चांगा वटेश्वर याने मुक्ताईचा अनुग्रह घेतला. या घटनेनंतर नामदेवांची गाठ पडली. भेटीच्या वेळी नामदेव २० वर्षांचे होते. ही भेट आळंदी येथे झाली. आपणच विठ्ठलाचे गाढे भक्त असा अहंकार नामदेवांना झाला होता. ते म्हणत आम्ही देवाच्या सान्निध्यात सतत राहातो मग कुणाचे चरण वंदनाची आवश्यकताच काय? निवृत्ती ज्ञानदेव, सोपान या तीनही भावंडांनी नामदेवांना चरण स्पर्श करून वंदन केले. नामदेवाने प्रति नमस्कार केला नाही. मुक्ताला हे खटकले व तिने वंदन न करताच गरजली -

अखंड जयाला देवाचा शेजार । काय अहंकार गेला नाही

मान अभिमान वाढविसी हेवा । दिस असता दिवा हाती घेसी

परब्रह्म संगे नित्य तुझा खेळ । आंधळ्या डोहाळे कां या आले

कल्पतरु तळवटी इच्छिल्या त्या गोष्टी । अद्यापी नरोटी राहिली का?

विठ्ठलाच्या सहवासात राहिला, परंतु नामदेवाचा कोरेपणा गेला नाही. चंदनाचे झाड खरे अहंकाररुपी सापाने

वेढिले आहे. भक्तीचा बोलवाला केला. अहंकार खुंट वाढविला. गुरुशिवाय हा कोरडाच राहिला. हे कच्चे मडके याला भाजून काढण्यासाठी गोरोबा काकाना बोलवा ते आण्यता कच्ची मडकी भाजतात. त्यांच्याकडून परीक्षा करून घ्या.

नामदेव आपल्या संप्रदायात यावेत अशी निवृत्तीनाथाना तळमळ लागली. त्यांनी नामदेवांना विसोबा खेचर यांजकडे गुरुपदेशासाठी पाठविले. नामदेव आंवढ्याला त्यांच्याकडे गेले. त्यावेळी विसोबा खेचर खुशाल मल्लिकार्जुनाच्या पिंडीवर पाय ठेवून विश्रांती घेत होते. हे पाहताच नामदेव क्षुब्ध झाले. ते म्हणतात -

'उठी उठी प्राण्या आंधळा तू काय । देवावरी पाय ठेवियले.'

यामुळे विसोबा खेचर जागे झाले. ते म्हणाले, नामा तुझ्यासारखा मी सर्वज्ञ आणि भक्त नाही. तुझा देव कसा आहे हे मला माहित नाही. आता देव नाही तिथे माझा पाय उचलून ठेव. यात गूढ अर्थ भरला आहे हे नामदेवांच्या ध्यानात आले. नामदेव मनोमनी समजले व म्हणाले खरेच - देवाविण ठाव हे बोलणेची वाव । परमेश्वराच्या सर्वव्यापित्वाच्या अज्ञानामुळेच मी विसोबावर रागावलो. पश्चात्तापाने त्यांची चित्तशुद्धी झाली. त्याचा अहंकार मावळला. त्यांनी विसोबांचे पाय धरले. अरूप परमात्मा पिंड, ब्रह्मांड, जल, स्थळ, काष्ठ, पाषाण, अणुरेणु व्यापून साक्षीभूत आहे हे तू जाणून घे. तो नाही असा काळ नाही व स्थळही नाही.

ही भावना दृढ कर - सुखाचे स्वरूप घेऊनी जा तरी । विठ्ठल नामे भरी तीन्ही लोक

खेचर विसा म्हणे येथूनी फाटिले । ते तुझ दिधले आहे नाम्या

असे हृदयाचे बोल सांगून नामदेवाच्या मस्तकावर हात ठेविला.

पाषाणात देव नाही - पाषाणाचा देव बोलेचिना कधी । हरी भव व्याधी कैसे घडे ।

तो देव नामिया हृदयी दाविला । खेचराने केला हा उपकारु ।

अध्यात्म जीवनात गुरु कृपा हा महत्त्वाचा टप्पा. आत्मबोधानंतर साक्षात्कार व मगच भ्रमनिरास होतो. विठ्ठलमूर्तीपेक्षा विठ्ठल नामाची महती अधिक आहे हे नामदेवाना कळले. विठ्ठल भक्ती म्हणजे समता, समदर्शिता, प्रसन्नता व बंधुता होय. 'नाचू कीर्तन रंगी । ज्ञान दीप लावू जगी' हे त्यांचे ध्येय बनले. गुरूना वंदन करून नामदेव पंढरपूरला परतले.

### अलौकिक यात्रा

ज्ञानोबा पंढरीस आले. विठ्ठलाच्या दर्शनानंतर ते नामदेवाकडे आले. नामदेवानी ज्ञानोबाच्या पायावर लोटांगण घातले व गौरवपूर्ण स्वागत केले. ज्ञानोबा म्हणाले, 'नामदेवा तू भक्त शिरोमणी आहेस - ज्ञानदेव म्हणे तू भक्त शिरोमणी । जोडिले जन्मोनी केशव चरण ।

प्रेमसुखे गोडी तुजची फावली । वासना मावळली सकल तुझी ।

एवढे बोलून त्यांनी आपले मनोगत व्यक्त केले. नामदेवा तीर्थयात्रेत तुझ्या सहवासाचे सुख लाभावे म्हणून मी तुला नेण्याकरता मुद्दाम आलो. तू माझे मनोरथ पूर्ण कर. नामदेवानी पांडुरंगाची अनुज्ञा मिळविली व ज्ञानदेवाबरोबर तीर्थयात्रेला गेले. तीर्थयात्रेतही विठ्ठला बद्दलची आत्यंतिक आस त्याना लागलेली होती. सर्वांशी नम्रतेने वागणे, हेच नमन, विठ्ठल प्रतीती हेच ध्यान, भगवंताच्या स्मरणात मन दृढ होणे हे निजध्यासन, विठ्ठलाचे ध्यान, त्याचेच सर्वत्र दर्शन, ईश प्रेमाचा आनंद भोगणे हीच श्रुती, एकांतात ध्यान हीच विश्रांती हा कायिक, वाचिक,

मानसिक त्रिविध प्रकारचा कार्यक्रम पाहून ज्ञानोबा हेलावले. ते म्हणतात -

भक्त भागवत बहुसाळ ऐकिले । बहु होवोनी गेले होती पुढे ।

परि नामयाचे बोलणे नव्हे हो कल्पांती । विचारने संती दूर दृष्टी ।

ती उभयता पंढरपूरहून निघाली तेथून कऱ्हाड, तापी नदी तीर, तेथून पश्चिमेस प्रभास पट्टण, सोमनाथ, द्वारका, त्यानंतर मथुरा, गया, बाराणसी, कुरुक्षेत्र, राजस्थानातील बिकानेर नजिक ही मंडळी आली. तेथे वालुकामय देश तुडविताना दोघेही तहानेने व्याकूळ झाले. तेथे एक विहीर आढळली ती खोलवर होती. ज्ञानोबांनी योग मार्गांनी व नामदेवांनी भक्तीच्या द्वारे विहिरीतले पाणी प्राशन केले. या विहीरीस अद्यापी नामदेव कुवा असे म्हणतात. शके १२१७ ला ही मंडळी महाराष्ट्राला परतली. १२१८ ला पंढरपूरला दाखल झाली. फार मोठ्या प्रमाणात मावंदे केले. सर्व लहानथोर भक्तमंडळी एका पंक्तीस जेवावयास बसली. हे सहभोजन खरोखरीचे होते. या उद्यापनाच्या कार्यक्रमानंतर वर्ष दीड वर्षाच्या आतच ज्ञानदेव आदी भावंडानी समाधी घेतली. शके १२१८ कार्तिक वद्य १३ आळंदी येते ज्ञानदेव, शके १२१८ मार्गशीर्ष वद्य १३ सासवड येथे सोपान देव, शके १२१९ ज्येष्ठ वद्य १२ एदलाबाद येथे मुक्ता, शके १२१९ ज्येष्ठ वद्य १२ त्र्यंबकेश्वर येथे निवृत्ती नाथ तसेच शके १२२० माघ वद्य ११ पुणतांबे येथे चांगदेव समाधिस्थ झाले. या समाधीबद्दलचे नामदेवांचे अभंग हृदयाला पीळ पाडतील असे आहेत.

**भारत यात्रा -**

ज्ञान दीप लावू जगी । असंख्य दीप उजळून मानवी जीवन उज्वल करण्याचे त्यांनी आपले जीवन ध्येय ठरविले होते. जनतेचा आध्यात्मिक दृष्ट्या विकास व्हावा हेच त्यांनी चिंतिले होते. भक्ती प्रचारासाठी त्यांनी आंतरप्रांतीय भाषा आत्मसात केली. आयुष्यभर भारत भ्रमण चालू ठेविले. ते दक्षिणेत म्हैसूर, तामिळनाडू, रामेश्वरपर्यंत गेले. उत्तरेकडे गुजरात, सौराष्ट्र, सिंधुप्रदेश, राजस्थान, मध्य प्रदेश तसेच उत्तर प्रदेश पंजाब, हरियाणा, हिमाचल प्रदेश असा प्रचार करीत ते गेले. पुन: पंजाबात आले ते पंजाबी भाषा शिकले व त्या भाषेत व हिंदी भाषेत पद्ये लिहिली. प्रांतीय भाषा शिकून त्याद्वारे लोक जागृती केली. देशभक्तीची धुमाळी भारतभर उधळून दिली. भक्तिभावांचे वातावरण त्या त्या प्रदेशात संचारण करून निर्माण केले.

ज्ञानेश्वरानंतर नामदेव चौपन्न वर्षे जगले. या दीर्घकाळात कन्याकुमारीपासून तो हिमालयापर्यंत अनेकदा पदयात्रा केल्या. त्या भयाण अंध:कारमय स्थितीत जनतेला अभय देणारा हा महापुरुष संपूर्ण उत्तर प्रदेशात प्रचार करता झाला. तेथे समाज संघटित व जागृत केला. भक्तिमार्गाचा झेंडा फडकविला. समाज भावनेत स्फुरण निर्माण केले. ज्ञानोबाबरोबर पहिली यात्रा शके १२१३ ते १२१८ पर्यंत केली. दुसरी यात्रा दक्षिण भारतात व नंतर प्रदीर्घ यात्रा शके १२२० ते १२२६ या सहा वर्षांत केली.

या सर्व यात्रांची माहिती तीर्थावळी अभंगात पाहावयास मिळते. त्यावरून नामदेव संपूर्ण भारतभर प्रचार करत फिरले हे समजते. नीरा-भीवरा संगम, गोदावरी, नाशिक, पंचवटी, घृष्णेश्वर, ओंकार मांधाता, द्वारका, खैतक, हवळपूर, मुचकुंद गुंफा, प्रभास, सोमनाथ, सिद्धपूर, पुष्कर, कुरुक्षेत्र, ठाणेश्वर, यमुनातीर, इंद्रप्रस्थ, हस्तिनापूर, मायापूर, हरिद्वार, हृषीकेश, देवप्रयाग, केदार, कैलास, बद्रीनारायण, मान सरोवर, गंडकी, अयोध्या, नैमिषारण्य, मधुपुरी, गोकुळ, वृंदावन, कालिया डोह, गौतमेश्वर मिथिला (जनकपुरी) उज्जयिनी प्रयाग, काशीविश्वेश्वर, गया, गंगासागर, संगम महाबळेश्वर परत पंढरपूर. चवथ्या पदयात्रेत ईश्वरभक्तीचा प्रचंड प्रचार केला. त्याचा प्रभाव

मध्य प्रदेश व उत्तर भारताच्या साहित्यावर झाला.

नरसी मेहता (शके १३३४ ते १४००) नामदेवासंबंधी गौरवोद्गार काढतात.

जेणे नामानु छापरु छायी आलमू - ज्याने नामाची झोपडी दुरुस्त केली. नाम हाथ ते दूध पिला । नामानु छापरू आल्यू छाई ।

राजस्थानात नामदेवानी हरि-कीर्तनाचा पाऊस पाडला. त्या प्रदेशात छोटी मोठी दीडशेवर नामदेवाची मंदिर आहेत. त्यांच्या प्रचार कार्याची ही साक्ष आहे. या प्रचारामुळे तेथील शिंपी नामदेवांना छिपा दर्जी असे म्हणू लागले. यांची संख्या आजही बरीच मोठी आहे. मीराबाईने नामदेवांचा उल्लेख केला आहे.

म्हारे नेणा आगे रहाजो जी स्याम गोविंद।
टेक दास कबीर घर बालद जो लाया,
नामदेव की छान छवंद
दास धनाकी खेत निपजायो, गज की टेर सुनन्द
सब सन्तो का काज सुधारा मी सूं दूर रहन्द ।

नामदेवांनी कीर्तन संस्थेच्या व्यासपीठावरून एकेश्वर वादाचा विशुद्ध भक्तीचा, जातिवर्ण निरपेक्ष मानव धर्माचा आणि सदाचार पूर्ण जीवनाचा उपदेश त्याकाळी तेथील लोकभाषेत केला. ही त्यांची पदयात्रा शके १२५९ साली संपली.

शके १२६० साली चोखामेळा मंगळवेढे येथे कुसाचे काम करीत असताना अपघात झाल्याने इहलोक सोडून गेले. त्यांच्या अस्थी पंढरपुरास आणून देवाच्या महाद्वारासमोर त्यांचे स्मारक नामदेवांनी उभे केले.

शके १२६१ साली ते पुन: उत्तरेकडे गेले. प्रथम द्वारका तेथून मारवाड, मथुरा, हरिद्वार करून पंजाबात आले. हरिद्वार जवळील ज्वालापूर येथे नामदेवांच्या नावे एक मठ अद्याप आहे. अमृतसर जिल्हात भूतपिंड म्हणून गाव आहे. तेथील एका विधवेला मरणातून वाचविले. पुढे तिचा मुलगा बाला बोहरदास म्हणून नामदेवांचा शिष्य झाला. धोमान येथील देवालयाची व्यवस्था अद्याप बोहरदासाच्या वंशजाकडे आहे. तेथून गुरुदास पूर जिल्ह्यातून मरड गावी गेले. भट्टीवाल गावात पाण्याची टंचाई होती. नामदेवांनी तेथील लोकांना एक जागा दाखविली तिथे पाणी लागले. त्या गावात जल्लो व लध्धा असे दोन शिष्य मिळाले. यांनी नामदेवांच्या शिकवणीचा प्रसार केला. धोमान हे नामदेवानी वसविलेले गाव. तेथील तळ्यात चांगले पाणी लागले. तिथे केशो (केशव). नावाचा शिष्य मिळाला. हा ब्रह्मचारी होता व त्याला महारोग होता. नामदेवाकडे तो आला. तळ्यात स्नान केल्यावर त्याचा महारोग बरा झाला. हा भावळ पूरसंस्थानात लोकाना भागवत धर्माची शिकवण देऊ लागला. त्याचा आश्रम आजही त्या गावी आहे.

अल्लाउद्दिन खिलजी याच्या कानावर नामदेवांची कीर्ती गेली. त्याला नामदेवाना भेटण्याची तीव्र इच्छा झाली. खूप नजराणा घेऊन तो भेटीला आला. नामदेवानी नजराणा स्वीकारला नाही. त्यांनी तिथे एक मंदिर उभे करण्याचे ठरविले. तेच धोमान येथील मंदिराचे मूळ. त्या मंदिरासाठी अल्लाउद्दिनाने जमीनही इनाम दिले. पंजाबात आजही बरीच नामदेवांची मंदिरे आहेत. धोमान येथे शके १२७१ पर्यंत नामदेव राहिले. मकर संक्रातीला त्यांनी पंढरपूरास प्रयाण केले. तो दिवस माघ शुद्ध २ होता. आजही या दिवशी तिथे महायात्रा निघते.

**समाधी**

या चौपन्न वर्षाच्या कालावधीत लोकाना भक्तिरस पाजून त्यांच्या अंत:करणात भक्तिचे बीजारोपण केले व त्याना सद्धर्म प्रवृत्त केले. भागवत धर्माच्या प्रसारार्थ त्यांनी सारे जीवन वेचले. जेथे जात तेथे अभंग, संकीर्तन, लोकात ईश्वरीभक्ती, परस्पर प्रेमभाव, जनसेवा यांचा प्रारंभ केला.

त्यानी जात गोत्र, प्रांत आदी बांध फोडले. लोकांना जनार्दनाच्या भजनीं लावले. 'जनी जनार्दन ऐसा भाव' हा त्यांचा एकमेव स्थायी भाव. आकल्प आयुष्य व्हावे तया कुळा । माझिया सकळा हरीच्या दासा । हीच मानवतेची विशाल उदात्त मौलिक गोष्ट त्यांचे जीवन कार्य ठरले. उत्तरेकडे लोकसंघटनेचे कार्य आटोपून ते पंढरपूरी परतले. शके १२७१ आषाढ शुद्ध ११ या दिवशी नामदेवांनी पंढरीनाथाला आळविले व त्याजकडे समाधीची अनुज्ञा मागितली. त्यांचा शिष्य परिसा भागवत म्हणतो - आषाढ शुद्ध एकादशी । नामा विनवी विठ्ठलासी ।

आज्ञा द्यावी हो मजसी । समाधि विश्रांती लागी ॥
आयुष्य कळसासी आले । अभंगत्वा सिद्धि नेले ।

ज्ञानेश्वर संगति घडले । तीर्थविधे जगदुध्दार । जन्मा आलियाने कृत्य । जन लावावे सुपंथे ।

विठ्ठल मंत्र त्रिभुवनात । जग जाणित महिमा हे ।
सर्व सिद्धि मनोरथ । तुझे कृपेने समस्त ।

म्हणे परिसा भागवत । नामा नाम जपतसे ॥

नामदेव शके १२७२ आषाढ शुद्ध १३, विकृत नाम संवत्सरे या दिवशी (शनिवार ३ जुलै सन १३५०) वयाच्या ८० व्या वर्षी पंढरपूरच्या विठ्ठल मंदिराच्या महाद्वारात समाधिस्थ झाले. पंढरपूरला येणाऱ्या असंख्य भक्तांच्या चरणरजाने आपल्यास न्हाऊ घालावे अशी नामदेवांची इच्छा होती. महाद्वारातील पहिल्या पायरीच्या जागी ते समाधिस्त झाले. त्याला नामदेवाची पायरी म्हणतात.

**नामदेवांची अभंगवाणी -**

मनुष्यत्व व देवत्व यांच्या सीमामधील दुवा म्हणजे नामदेवांचे चरित्र. श्रद्धेच्या जोरावर पाषाणात चैतन्य निर्माण करणारी असामान्य व्यक्ती म्हणजे नामदेव होय. त्यांच्या जीवनातील अखंड एक लयबद्धता होती. ती म्हणजे भक्ती. विठ्ठलाच्या नामघोषाने बेहोषीने नाचणे हे त्यांचे जीवन होते. त्याने ही गोडी अनेकांना आपल्या अभंग वाङ्‌मयातून दिलेली आहे. त्यांच्या वाङ्‌मयात अखंड भक्तीचा प्रवाह वाहताना आढळतो. त्यांच्या अंत:करणातील भाव तीव्रतेने दाटून आलेला पाहता येतो. त्यांची काव्य रचना म्हणजे त्यानी अनुभवलेल्या भाव स्थितीचे प्रगटीकरण आहे. त्यांच्या काव्यात अभंग, आख्याने, चरित्रे, आत्मचरित्र, प्रवास वर्णन आदि आढळतात दशावतार वर्णन, हरिश्चंद्र आख्यान, श्रीयाळ आख्यान, ध्रुवाख्यान अशी रसपूर्ण आख्याने त्यांनी लिहिली आहेत. तळमळीचा उपदेश, ध्येय मार्गाने चालण्यासाठी मुमुक्षूंना व साधकांना उपयुक्त मार्गदर्शन, भूपाळ्या, आरत्या आदी निर्मिती त्यांनी केली आहे.

या सर्व वाङ्‌मय प्रकारातून नामदेवांची भाव निष्ठता व्यक्त होते. अनुभव सृष्टीतील भावदर्शनास बहर येतो. भक्तिवात्सल्य व कारुण्य यांचे अविष्कार करताना नामदेव रंगून जातात. ज्ञानेश्वर चरित्र त्यांच्या जीवनाचा धागा आहे. दनामा म्हणजे आता लोपला दिनकर । बाप ज्ञानेश्वर समाधिस्थ । त्यांचा उपदेश त्यांच्या भावनेच्या तळमळीतून स्फुरतो. म्हणोनिया जिने त्रासू घेतला । सत्य लोपले धर्म बुडाला । अजूनि काय पाहतोसि उगला । धावे विठ्ठला म्हणे नामा ।

अनुभवा पूर्वीचा, अनुभवा वेळचा व अनुभवानंतरचा असे यांच्या स्फुट कवितेचे विभाग पडतात. पक्व दशेचा अनुभव ही यात पाहावयास मिळतो. त्यांच्या भावमय कवितेतूनचे हे सहजोद्गार पहा.

बंदावे ते काय निंदावे ते काय । सर्वांठायी मोहे कोंदटले । आहे कवणाठायी नाही कवणा ठायी ।

ठायीच्या पै ठायी कोंदाटले । त्यांची सगुणभक्ती यातून घडते. नामदेव भाव समाधित विठ्ठलमय होऊन जातात. ही अनुभूती विलक्षण आहे. ते म्हणतात -

जीव विठ्ठल आत्मा विठ्ठल । परमात्मा विठ्ठल विठ्ठल । जनक विठ्ठल, जननी विठ्ठल ।

सोयरा विठ्ठल रुप विठ्ठल । पतित पावन विठ्ठल विठ्ठल नामा ।

हे भावमयतेचे संपूर्ण रूप आहे. विठ्ठलाला माऊलीच्या रूपात पाहून अत्यंत वात्सल्यमय भावात त्यांचे दर्शन घेणे नामदेवाना आवडे. विठाई माऊली कृपेची सावली, हे त्यांचे ईश्वरविषयक सूत्र आहे. आदी, तीर्थावली व समाधी ही तीन प्रकरणे ज्ञानदेव चरित्राचे घटक आहेत. आदिमध्ये ज्ञानदेवांचा पूर्ववृत्तांत, जन्म, बालपण, त्यांना सोसावी लागलेली जन निन्दा, प्रमुख प्रसंग, चमत्कार, तीर्थावली तीर्थयात्रेचे वर्णन समाधीत भावनांचा अविष्कार असलेला आढळतो. तीर्थावली हे एक उपयुक्त ऐतिहासिक प्रमाण साधन आहे. ५९ अभंगाचे हे स्वयंपूर्ण प्रकरणे आहे. हा चरित्रलेखातील अत्यंत रमणीय भाग आहे.

मराठी सारस्वतास अभंग वृत्तीची देणगी देणाऱ्या आणि मराठीतील आद्य आत्मचरित्रकार म्हणून प्रसिद्धी पावलेले संतश्रेष्ठ नामदेवांची गाथा महाराष्ट्र शासनाने प्रकाशित केली आहे. भारतीय जीवनात संत महात्म्यानी केलेले कार्य फार मोलाचे आहे. महाराष्ट्र समाज जीवनात संत ज्ञानदेव, नामदेव, एकनाथ, तुकाराम रामदास या पाच संत कवींचे कार्य अद्वितीय असेच आहे. आज शतकानुशतके ह्या संतांची अमृतवाणी महाराष्ट्रीय मनाला संजीवनी देत आली आहे. हे पाच संत म्हणजे महाराष्ट्राचे पंचप्राण होत. ह्यांचे साहित्य जन कल्याणासाठी निर्माण झालेले साहित्य होय.

संतांनी गोड वाणीने परमार्थ शिकविला, परधर्म व परचक्र या उभयविध आक्रमणाविरुद्ध कोट उभा केला. हा कोट स्वसंरक्षणाचा होता. स्वधर्म, स्वभाषा, स्वराष्ट्र यांच्या अभिमानाच्या रज्जूनी सर्वांची हृदये एकत्र सांधली. अभेद्य तट बनविला ही प्रमुख कामगिरी संतांनी केली. नामदेवांच्या काव्यात कुठेही कृत्रिमता आढळत नाही. स्वच्छ तेजस्वी जीवनाचा प्रत्यय येतो. अनुभवाचा अस्सलपणा त्यांच्या कृतीतून व वाणीतून ठायी ठायी प्रगट होतो.

उपसंहार - आजच्या भौतिकतेला शरण गेलेल्या समाजाचे चित्र उभे केल्यास प्रमुखत्वाने अश्रद्धा व स्वयंकेंद्रीयता आढळून येतील. यामुळे मनाचा तोल हरवून गेल्याने आज अनेक जीवन मूल्यांची उलथापालथ झालेली आहे. आजच्या लोकांच्या व्यवहारातून बेतालपणाचे अनेक प्रसंग घडत असताना आढळतात. जुनी मूल्ये नष्ट झाली. नवीन मूल्यांना आकार आलेला नाही. मानवी जीवन यंत्रवत् जड झाले आहे. 'पैसे गोळा करणारे यंत्र म्हणजे मनुष्य' अशी मानवाची नवी व्याख्या बनू पाहात आहे. ही जडता संभ्रमित अवस्था वरवरून आर्थिक स्वरूपाची वाटली तरी ती दुबळ्या मानवी मनाची अभिव्यक्ती आहे. मानव भौतिकतेने संपन्न व मानसिकरीत्या खंगलेला असे एकांगी जीवन जगत आहे. या मानसिक अनारोग्यावर मानव्याचे, नीतीचे, ईश्वरभक्तीचे, धर्मभावनेचे व शाश्वत जीवनमूल्यांचे संस्कार-रसायन हे गुणकारी ठरेल. यासाठी अशा थोर महात्म्यांचे जीवनपण उलगडून पाहण्याचे आपणाला हे रसायन प्राप्त होईल, याचा शांतपणे विचार व्हावा. तरच नामदेवांचे पुण्यस्मरण योग्य होईल. ही तेजस्वी जीवनाकडे नेणारी जीवनपताका आहे.

ग्रं. बा. मठ
६, कुमार आशिष,
राम मारुती रोड,
ठाणे - ४०० ६०२.

•••

# विद्युत चुंबकीय लहरी आणि आपण

*विद्युत चुंबकीय लहरींचा अभ्यास करणारे शास्त्रज्ञ या लहरींच्या परिमाणाविषयी नेहमी प्रयोग करीत असतात. या परिणामांचा विचार मांडणारा हा लेख. - संपादक*

आधुनिक काळात बारा महिने चोवीस तास आपण विद्युतचुंबकीय लहरींच्या छायेत वावरत असतो. दूरदर्शनसमोर बसून रिमिक्सडचे आचरट नाच पाहण्यात आपण मश्गुल असतो तेव्हा दूरदर्शनच्या पडद्यावरून येणाऱ्या विद्युतचुंबकीय लहरी आपल्या शरीरावर आक्रमण करीत असतात, पण आपल्याला त्याची जाणीव देखील नसते. तिन्ही, त्रिकाळ संगणकासमोर बसून काम करणाऱ्या व्यक्तींच्या छातीवर संगणकाच्या पडद्यावरून येणाऱ्या विद्युत चुंबकीय लहरी आदळत असतात. घरात चोवीस तास भिरभिरणारे पंखे, फ्लुरोसेन्ट ट्यूब, मिक्सर, व्हॅक्युम क्लिनर, एक ना दोन अनेक प्रकारची विद्युत यंत्रे तुमच्या शरीरावर विद्युतचुंबकीय लहरींचा मारा करीत असतात. त्यामध्येच आता 'कर लो दुनिया मुठ्ठी में' म्हणत घराघरात शिरलेल्या मोबाईलचीही भर पडली आहे. लोकलमध्ये बसल्या-बसल्या, कार चालविताना किंवा रस्त्यावरून चालताना आपल्या कानाला मोबाईल लावून मोठ्याने बडबडणाऱ्यांचा आणि सुखवस्तू समजणाऱ्यांचा एक वर्ग निर्माण झाला आहे. परंतु या सेल्यूलर फोनमधून प्रक्षेपित होणाऱ्या विद्युत चुंबकीय लहरी खास मेंदूचाच आश्रय घेतात हे मात्र अनेकांना माहीत नसते.

साऱ्या जगभर कर्करोगाच्या प्रमाणात लक्षणीय वाढ होण्याचे कारण या विविध प्रकारच्या विद्युतचुंबकीय लहरींचे शरीरावर होणारे आक्रमण हेच असावे, असे अनेक शास्त्रज्ञांचे मत झाले आहे. अतिशय ऊर्जा असलेल्या विद्युतचुंबकीय लहरी शरीरातील पेशींवर आघात करतात आणि त्यांच्यामध्ये विकृती निर्माण करू शकतात. अशा विकृत पेशीच पुढे कर्करोगग्रस्त होतात. असा या शास्त्रज्ञांचा दावा आहे. आपण दैनंदिन जीवनात जी विद्युत उपकरणे वापरतो त्यामधून प्रक्षेपित होणाऱ्या विद्युत चुंबकीय लहरींची ऊर्जा फारशी नसते. तरीही त्यांचा कळत नकळत काही परिणाम आपल्या शरीरावर होतो. सेल्युलर फोन कानाजवळ म्हणजेच मेंदूजवळ ठेवून संभाषण केल्यामुळे त्यातून प्रक्षेपित होणाऱ्या विद्युतचुंबकीय लहरींचा परिणाम माणसाच्या मेंदूवर होऊ शकेल, असा काही शास्त्रज्ञांचा तर्क आहे. पण या तर्कांसाठी भरभक्कम पुरावा मात्र अजून मिळालेला नाही.

विद्युतनिर्मिती केंद्रापासून जाडजाड तारांच्या साहाय्याने विद्युतप्रवाह अत्यंत दूरवर पोहोचविला जातो. शहरात आणि शहरांच्या बाहेर अशा तारा लटकलेले अनेक उंच मनोरे कुठेही दृष्टीला पडतात. अशा विद्युतवाहक तारांमधून शेकडो अँम्पियर आणि सहस्त्रावधी व्होल्ट विद्युत दाब असलेला विद्युतप्रवाह वाहत असतो. या प्रवाहाद्वारे विद्युत चुंबकीय क्षेत्र निर्माण होते आणि त्याचा प्रभाव विद्युतवाहक तारांपासून सुमारे शंभर मीटरपर्यंतच्या अंतरापर्यंत पडू शकतो. अशा विद्युतवाहक तारांच्या सतत संपर्कात असणाऱ्या लोकांवर विद्युत चुंबकीय लहरींचा परिणाम होऊ शकेल, असा अनेक शास्त्रज्ञांचा दावा आहे.

सूर्यावर निर्माण होणाऱ्या



काळ्या डागांचे अकरा वर्षीय चक्र सुप्रसिद्ध आहे. दर अकरा वर्षांच्या कालांतराने सूर्यावरील काळ्या डागांची संख्या उच्चतम होते. याच काळात पृथ्वीवर प्रचंड विद्युत चुंबकीय वादळे उद्‌भवतात. विशेषत: अती उत्तरेकडील प्रदेशात अशा वादळांमुळे संपर्क यंत्रणा कोलडून पडते. रेडियो, दूरदर्शन, दूरध्वनी वगैरे सेवांवरही गदा येते. वस्तुत: ज्या काळात सूर्यावरील काळ्या डागांची संख्या उच्चतम असते त्याच काळात सूर्याच्या चुंबकीय क्षेत्रात प्रचंड उलाढाल सुरू असते. सूर्यावर काळ्या डागांची संख्या उच्चतम असणाऱ्या काळात इकडे पृथ्वीवर कर्करोगाची लागण होणाऱ्या लोकांमध्ये लक्षणीय वाढ होते, असे शास्त्रज्ञांनी एका प्रयोगानुसार सप्रमाण दाखवून दिले आहे.

सूर्यावरील विद्युतचुंबकीय क्षेत्र मानवाच्या आणि प्राण्यांच्या शरीरात अतिशय सूक्ष्म विद्युतप्रवाह निर्माण करते. त्यामुळेच शरीरात विपरित परिणाम उत्पन्न होण्याची शक्यता आहे, असे शास्त्रज्ञांचे मत आहे. महत्त्वाची गोष्ट अशी की, अशाप्रकारे निर्माण होणारा विद्युतप्रवाह शरीरात सर्वत्र सारख्या प्रमाणात पसरत नाही. विद्युतक्षेत्रामुळे निर्माण होणारा आणि चुंबकीय क्षेत्रामुळे निर्माण होणारे विद्युतप्रवाह यांचे प्रमाणही वेगळे असते. तुम्ही उच्च विद्युत दाबाच्या ट्रान्समिशन लाइन्सच्या खाली उभे राहिलात तरी तुमच्या शरीरात एक लाखांश अँम्पियरपेक्षा जास्त विद्युतप्रवाह निर्माण होणार नाही. अर्थात इतका सूक्ष्म प्रवाह शरीरातील पेशींचा भेद करू शकणार नाही. परंतु आतापर्यंत या विषयात झालेल्या संशोधनानुसार ५० ते ६० हर्टझ विद्युत प्रवाहता पेशी आणि टिश्यू यांच्या कार्यात बदल, रोगप्रतिकारक व्यवस्थेवर परिणाम, कर्करोगग्रस्त पेशींच्या वाढीत वेग, दैनंदिन जैविक चक्रात बदल, मेंदूच्या आणि हृदयाच्या कार्यतत्परतेत बदल असे अनेक घातक बदल शरीरात झाल्याचे निरिक्षणात आले आहेत.

विद्युत चुंबकीय लहरींचा मानवी शरीरावर सतत भडिमार होत असेल व त्याचा परिणाम म्हणून शरीरात कर्करोगाचा प्रादुर्भाव होणार असेल तर अशा लहरी टाळणे अत्यावश्यक ठरेल, यात शंकाच नाही. विशेषत: ज्या व्यक्तींना या विषयावर चालू असलेल्या चर्चेचे महत्त्व पटले असेल आणि जे लोक सतत विद्युतचुंबकीय लहरींच्या सान्निध्यात वावरतात त्यांच्या मनात चलबिचल होणे स्वाभाविक आहे. या वर्गात शास्त्रज्ञ, तंत्रज्ञ, उच्च विद्याविभूषित व्यक्ती आणि या परिणामांची जाणीव झालेल्या सुशिक्षित व्यक्तींचा समावेश करता येईल. आपल्या शरीरावर होणाऱ्या विद्युत चुंबकीय लहरींच्या आक्रमणाला कसे थोपविता येईल या विचाराने विशेषत: पाश्चात्य देशातील हा वर्ग चिंताग्रस्त झाला आहे. भारतात मात्र या विषयाची फारशी कुणी दखल घेतल्याचे दिसत नाही. त्यामुळे विद्युत चुंबकीय लहरींचा मानवी शरीरावर नेमका काय परिणाम होतो हे अधिक कसोशीने शोधून काढणे अत्यावश्यक आहे.

- गीतेश गजानन शिंदे

२०३, स्वप्नजा सोसायटी,

धोबी आळी, माउली मंडळ हॉल जवळ,

टेंभी नाका, ठाणे (प.) - ४०० ६०१.

दूरध्वनी : २५३७ ९५१९

## दिपावलीनिमित्त

हार्दिक शुभेच्छा !



# खाजगी कोचिंग क्लासेस विरुद्ध शाळा - एक अघोषित युद्ध

*वारंवार बोलला जाणारा, चर्चिला जाणारा हा विषय आहे. श्री. अरदकर यांच्या सारख्या अनुभवी शिक्षकाचे हे विचार. - संपादक*

दरवर्षी एस्. एस्. सी. परीक्षेचा निकाल लागल्यानंतर वर्तमानपत्रातून निरनिराळ्या खाजगी कोचिंग क्लासेसच्या जाहिराती झळकतात. त्यामध्ये बोर्डाच्या गुणवत्ता यादीमध्ये झळकलेल्या, त्यांच्या क्लासेसला येणाऱ्या विद्यार्थ्यांची नावे त्यांच्या फोटोसहित छापलेली असतात आणि त्यांच्या क्लासेसच्या मार्गदर्शनामुळेच त्या विद्यार्थ्यांना उज्वल यश मिळाल्याचा दावा केलेला असतो आणि त्यांच्या क्लासला विद्यार्थ्यांनी प्रवेश घेण्यासंबंधी आवाहन केलेले असते. क्लासेसच्या ह्या दाव्यामध्ये कितपत तथ्य असते ? शाळेतील शिक्षकांच्या अध्यापनाला त्याचे बिलकूल श्रेय जात नाही, असे त्यांना सुचवावयाचे असते का ? गुणवत्ता यादीमध्ये आलेले काही विद्यार्थी देखील त्यांच्या मुलाखतीमध्ये ते ज्या क्लासला जात असतील त्या क्लासला देखील काही अंशी यशाचे श्रेय देताना आढळून येतात. परंतु १००% श्रेय ते खाजगी कोचिंग क्लासेसना देताना आढळत नाहीत. माझ्या मते विद्यार्थ्याने एस्. एस्. सी. परीक्षेत मिळविलेले यश हे सामूहिक यश असते. त्यामध्ये विद्यार्थ्याने स्वतः केलेली मेहनत, पालक, शाळेतील शिक्षक आणि खाजगी कोचिंग क्लासेस ह्यांमधील शिक्षकांचे मार्गदर्शन यांचा कमीजास्त परंतु महत्त्वाचा वाटा असतो.

एकदा मी एका नामवंत खाजगी कोचिंग क्लासच्या पालक सभेला पालक म्हणून उपस्थित होतो. त्यावेळी त्या क्लासचे प्रतिनिधित्व करणाऱ्या वक्त्याने आपल्या भाषणाची सुरुवात खालीलप्रमाणे केली -

Now-a-days nothing is taught in the schools, so teaching has to be done by classes. Now a day School's have become merely centres of sending students for the S.S.C. exam. हा त्या व्याख्यात्याचा दृष्टिकोन आणि अभिनिवेश मला फारच खटकला. कदाचित मी स्वतः एक शिक्षक असल्यामुळे असेल परंतु त्यांचे ते बोलणे मला जिव्हारी झोंबले आणि मी अंतर्मुख होऊन विचार करू लागलो की खरोखरच अशी वस्तुस्थिती आहे का? केवळ नाईलाज म्हणून पालक आपल्या पाल्यांना शाळेत पाठवतात का? शाळेत काहीच शिकवले जात नाही का? केवळ एस्.एस्.सी. परीक्षेला आपल्या पाल्यांना बसविणारी केंद्रे ह्या दृष्टिकोनातून शाळांकडे पाहिले जात आहे का?

५०/७५ वर्षांपूर्वी विद्यार्थी आणि त्यांचे पालक अभ्यासासाठी पूर्णपणे शाळेवर अवलंबून असत. त्यावेळी खाजगी कोचिंग क्लासेस शहरातून सुद्धा फारसे नव्हते. एखादा विद्यार्थी एखाद्या विषयात कच्चा असल्यास (उदा. इंग्रजी, गणित) पालक शाळेत त्याला तो विषय शिकविणाऱ्या शिक्षकाच्या घरी खाजगी शिकवणीला पाठवत असत. अशा विद्यार्थ्यांकडे इतर विद्यार्थी 'ढ' विद्यार्थी ह्या दृष्टिकोनातून पाहत असत. काही श्रीमंत पालक गरजू शिक्षकांना आपल्या पाल्याला शिकवण्यासाठी घरी बोलावत असत. पण ह्याचे प्रमाण अत्यल्प असे. बव्हंशी विद्यार्थी आपल्या अभ्यासासाठी शाळेवरच अवलंबून असत. त्यामुळे एस्.एस्.सी. परिक्षेतील यशापयशाचे सारे श्रेय-अपश्रेय शाळेचेच असे.

पण आता परिस्थिती पालटली आहे. कुठल्याही शाळेतील बहुसंख्य विद्यार्थी, मग ते हुशार असोत किंवा 'ढ' असोत आजकाल खाजगी कोचिंग क्लासेसना जाताना

आढळतात. अगदीच ज्या पालकांना आर्थिक परिस्थितीमुळे शक्य नसते. त्यांचेच पाल्य कुठल्याच क्लासला जात नाहीत, असे आढळून येते. याचे कारण काय असावे बरं ? नामवंत शाळांमधून देखील शिकवले जात नाही का? तज्ज्ञ आणि अनुभवी शिक्षकांनी शिकवून देखील विद्यार्थ्यांना समजत नाही असे म्हणावे का ? खाजगी कोचिंग क्लासेस मधून उत्कृष्ट शिक्षण दिले जाते का? का त्यांच्याकडे अशी काही गुरुकिल्ली आहे की ज्या योगे सर्वसामान्य बुद्धी आणि कुवत असलेल्या विद्यार्थ्याला देखील सर्व गोष्टी भराभर आकलन होऊ शकतात?

विद्यार्थी खाजगी कोचिंग क्लासेसना जातात त्याचे प्रमुख कारण म्हणजे शाळेतील विद्यार्थी संख्या. वर्गामध्ये ७०/८० विद्यार्थी असतात. त्यामुळे शिक्षकांना वैयक्तिक लक्ष देता येत नाही. विद्यार्थ्यांचे गृहपाठ तपासणे इच्छा असून देखील त्यांना शक्य नसते. एखादा नवीन अननुभवी शिक्षक असेल तर त्याला विद्यार्थी संख्येमुळे वर्गनियंत्रण करणे जमत नाही. वर्गात योग्य वातावरण नसल्यामुळे अध्ययन-अध्यापन प्रक्रिया व्यवस्थित होऊ शकत नाही. इंग्रजी, गणित ह्यासारख्या कठीण विषयांच्या बाबतीत उजळणी, प्रश्नपत्रिकांचा सराव इ. गोष्टी आवश्यक असतात. काही वेळा शिक्षक परीक्षेपर्यंत पोर्शन पूर्ण करण्याचेच काम करीत असतात. मग या गोष्टींना वेळ कुठून मिळणार? परिणामी सर्वसामान्य विद्यार्थी कित्येकदा या विषयांमध्ये अनुत्तीर्ण होतो किंवा कमी गुण मिळवतो. मग त्याच्या पालकांना असे वाटणे साहजिक आहे की त्याला खाजगी कोचिंग क्लासला पाठविल्यास चांगले गुण मिळतील. तो निदान उत्तीर्ण तरी नक्की होईल. हे झाले सामान्य विद्यार्थ्यांचे. मग हुशार विद्यार्थ्यांचे काय ?

आजचे युग हे स्पर्धेचे युग आहे. आजकाल एस्.एस्.सी. परीक्षेमध्ये चांगले गुण मिळूनसुद्धा चांगल्या कॉलेजमध्ये प्रवेश मिळत नाही. एकेका गुणांमुळे विद्यार्थ्याला प्रवेशापासून वंचित रहावे लागते. त्यामुळे आपल्याला परिक्षेमध्ये जास्तीत जास्त टक्के कसे मिळतील, या दृष्टीने विद्यार्थी आणि पालक ह्यांचे प्रयत्न असतात. काही हुशार विद्यार्थ्यांना आणि त्यांच्या पालकांना असे वाटत असते की खाजगी कोचिंग क्लासमुळे त्यांच्या टक्केवारीत भर पडेल. आपण गुणवत्ता यादीमध्ये येऊ. सर्वच पालक आपल्या पाल्यांना मार्गदर्शन करु शकत नाही. यामुळे आपल्या पाल्याला क्लासला धाडून ते आर्थिक बोजा उचलतात आणि आपले पालकांचे कर्तव्य पार पाडल्याच्या समाधनात कृतकृत्य होतात.

खाजगी कोचिंग क्लासेसच्या विद्यार्थ्यांना काहीच फायदा होत नाही, असे मला म्हणावयाचे नाही. विशेषत: कच्च्या विद्यार्थ्यांना त्याचा फायदा निश्चित होतो. सर्वसामान्य विद्यार्थ्यांना कठीण विषय एकदा शिकवून समजत नाही. शाळेत झालेला भाग क्लासमध्ये पुन्हा शिकविला जातो. त्यामुळे त्या पाठ्यांशाची एक प्रकारे उजळणी होते. त्याचे दृढीकरण व्हायला मदत होते. त्याचा थोडाफार फायदा कच्च्या विद्यार्थ्यांना होतो. हुशार विद्यार्थ्यांच्या बाबतीत देखील ह्यामुळेच काही प्रमाणात त्यांची टक्केवारी वाढू शकते. एखाद्या शाळेमध्ये एखादा विषय एखाद्या वर्गाला शिकवणारा शिक्षक अभ्यासपूर्ण आणि प्रभावी अध्यापन करणारा नसेल आणि योगायोगाने तो विषय शिकविणारा क्लासमधील शिक्षक कुशल असेल तर त्याचा देखील फायदा त्या विद्यार्थ्यांना कळत-नकळत मिळू शकतो.

वरीलप्रमाणे खाजगी कोचिंग क्लासेसचे काही फायदे होत असले तरी तोटेच जास्त होताना दृष्टोत्पत्तीस येते. पहिली गोष्ट म्हणजे शालेय बेशिस्तीला हे खाजगी कोचिंग क्लासेसला जाणारे विद्यार्थी बहुतेक वेळा जबाबदार असतात. एखादा पाठ्यांश त्यांना क्लासमध्ये आधीच शिकवलेला असला तर आपला अभ्यास झालेला आहे, आपल्याला समजलेले आहे. ह्या भ्रामक समजुतीमुळे काही विद्यार्थी वर्गातील शिक्षकांच्या अध्यापनाकडे लक्ष देत नाहीत. मग दुसरे उद्योग करायला त्यांना भरपूर वेळ असतो. त्यामुळे त्यातून बेशिस्तीची समस्या निर्माण होते. दुसरे

म्हणजे बऱ्याच खाजगी कोचिंग क्लासेसमधून रेडिमेड मटेरियल, नोटस् वगैरे पुरवल्या जातात. ते त्या क्लासचे खास आकर्षण देखील असते. ही गोष्ट आळशी विद्यार्थ्यांच्या पथ्यावरच पडते. अध्ययनामध्ये विद्यार्थ्यांच्या स्वयंअध्ययनाला (Self-Study) अनन्यसाधारण महत्त्व आहे. स्वत: एखादा पाठ्यांश वाचून टिपणे काढणे, ही अभ्यासाची सवय योग्य वयात लागणे अतिशय महत्वाचे आहे. जी पुढे त्यांना भावी काळात उच्च स्तरावरील अभ्यासक्रमामध्ये उपयुक्त ठरू शकते. काही वेळा सोपे करून शिकवण्याच्या नादात Spoon-feeding केले जाते. ते देखील विद्यार्थ्यांच्या स्वतंत्र विचारशक्तीला घातक आहे, मारक आहे.

विद्यार्थ्यांच्या यशातील खाजगी कोचिंग क्लासेसचा वाटा मान्य केला तरी त्यामुळे शाळेतील शिक्षकांचे किंवा त्यांच्या अध्यापनाचे महत्त्व यत्किंचितही कमी होत नाही. शिक्षक जर पुरेशा पूर्वतयारीनिशी वर्गावर गेला, शैक्षणिक साधनांचा त्याने योग्य वापर केला तर त्याचे अध्यापन प्रभावी आणि परिणामकारक होऊ शकते. क्लासमधील शिक्षकांपेक्षा आपले शाळेतील शिक्षक उत्कृष्ट शिकवतात, याची विद्यार्थ्यांना खात्री पटल्यास शिक्षकांच्या शिकवण्याकडे विद्यार्थी नक्कीच लक्ष देतील. पाठ्यपुस्तकाबाहेर जाऊन एखाद्या शिक्षकाने काही अवांतर माहिती पुरविली तर विद्यार्थी विशेष रस घेऊन लक्ष देतात, असा माझा वैयक्तिक अनुभव आहे. सर्वात महत्त्वाची गोष्ट म्हणजे क्लासेसमध्ये फक्त विद्यार्थ्यांच्या ज्ञानात्मक बाजूकडे लक्ष दिले जाते. विद्यार्थ्यांना परिक्षेमध्ये जास्तीत जास्त गुण कसे मिळतील, ह्या दृष्टीने फक्त माहिती आणि ज्ञान दिले जाते. परंतु केवळ ज्ञान मिळविणे, परिक्षेमध्ये चांगले गुण मिळवून उत्तीर्ण होणे एवढाच शिक्षणाचा मर्यादित, संकुचित उद्देश नाही. शिक्षणामध्ये विद्यार्थ्यांचा सर्वांगीण व्यक्तिमत्त्व विकासाला महत्त्व आहे. शाळेमध्ये शिक्षणाचा ज्ञानात्मक बाजूबरोबरच भावात्मक आणि गुणात्मक बाजूंवर देखील तितकेच लक्ष केंद्रित केलेले असते. क्लासेसमध्ये फक्त बुद्धीचे पोषण होत असेल, परंतु मनाचे पोषण हे शाळांमधूनच होत असते. विद्यार्थ्यांवर त्यांच्या संस्कारक्षम वयात योग्य ते संस्कार करून त्यांच्यातून भावी सुजाण नागरिक घडविण्याचे कार्य शाळाच करत असतात. खाजगी कोचिंग क्लासेसमधून ह्या बाबींकडे कितपत लक्ष दिले जाते? शाळांमधून मूल्यशिक्षणाच्या तासिकेला आणि सर्व विषयांचे अध्यापन करत असताना प्रत्यक्ष वा अप्रत्यक्षरित्या मुलांवर संस्कार करण्याचे मौलिक कार्य शिक्षक करत असतात. शाळेतील विविध स्पर्धा, स्नेहसंमेलन, क्रीडा महोत्सव प्रदर्शन, सहली हस्तलिखित इ. विविध शालेय, सहशालेय उपक्रमांतून विद्यार्थ्यांमध्ये विविध गुणांचा परिपोष करण्याचे, त्यांच्या मनाची मशागत करण्याचे महत्वपूर्ण काम शिक्षक करत असतात. हे विसरून चालणार नाही. बदलत्या काळाला अनुसरून खाजगी कोचिंग क्लासेसचे महत्त्व मान्य केले, तरी त्यामुळे शाळा, शिक्षक आणि त्यांचे अध्यापन, त्याहीपेक्षा त्यांचे विद्यार्थ्यांच्या चारित्र्यसंवर्धनाचे कार्य ह्याचे महत्त्व तिळमात्रही कमी होत नाही.

एखादी नामवंत व्यक्ती, जीवनामध्ये उच्चपदस्थ प्रथितयश व्यक्ती, आपल्या शाळेचा बोलण्यातून, लेखनातून आवर्जून गौरवपूर्ण आणि अभिमानाने उल्लेख करते, ह्यात सर्व काही आले. अशी व्यक्ती ज्या दिवशी 'मी अमुक शाळेचा विद्यार्थी होतो' असे न म्हणता 'मी अमुक एका क्लासचा विद्यार्थी होतो' असे म्हणेल तो दिवस म्हणजे खाजगी कोचिंग क्लासेस विरुद्ध शाळा ह्या अघोषित किंवा शांतयुद्धाचा शेवट असेल आणि त्यात शाळेचा आणि प्रचलित शिक्षणपद्धतीचा पराभव झालेला असेल, असे खेदाने म्हणावे लागते.

श्री. प्रभाकर अरदकर
सहशिक्षक,
श्रीरंग विद्यालय, ठाणे

•••

# उपेक्षित ग्रंथ

*शासनमान्य ग्रंथपालन प्रमाणपत्र परीक्षेसाठी भरणाऱ्या त्रैमासिक वर्गातील विद्यार्थ्यांना कोणत्याही ५ दुर्मिळ, उपेक्षित ग्रंथांचा शोध या स्वरूपाचा गृहपाठ देण्यात येतो. त्यातील एका विद्यार्थिनीने करून दिलेला हा परिचय. - संपादक*

'ग्रंथपालन प्रमाणपत्र वर्ग' या अभ्यासक्रमात त्यावेळेस पाच दुर्मिळ अथवा उपेक्षित ग्रंथ शोधण्यास सांगितले गेले तेव्हा माझ्या मनात अनेक प्रश्न उभे राहिले, असे उपेक्षित अथवा दुर्मिळ ग्रंथ कोठे शोधायचे? दुर्मिळ ग्रंथ, उपेक्षित ग्रंथ म्हणजे नेमके कोणते ग्रंथ शोधायचे? हे ग्रंथ शोधून काय फायदा आहे?

हे ग्रंथ शोधता शोधता मात्र माझ्यात असलल्या अनेक उणीवा तर मला कळल्याच याशिवाय अनेक नवीन विषयांची माहिती ही मला समजली.

उपेक्षित ग्रंथ म्हणजे असे ग्रंथ की जे ग्रंथालयात मिळत आहेत परंतु त्या ग्रंथांसाठी वाचकच नाहीत. ग्रंथालय शास्त्राच्या 'प्रत्येक ग्रंथाला त्याचा वाचक मिळाला पाहिजे.' या नियमाची पूर्तता करावयाची असेल तर ग्रंथालयात असणाऱ्या अशा उपेक्षित ग्रंथांची माहिती ग्रंथपालाने वाचकांना करून देणे आवश्यक आहे.

उपेक्षित ग्रंथ शोधताना प्रथम वाचक कोणत्या ग्रंथाची जास्त मागणी करतो व कोणत्या ग्रंथाची मागणी करत नाही हे माहीत असणे आवश्यक आहे आणि हे समजण्यासाठी आधी एक वाचक म्हणून स्वत:चे वाचन असणेही जरूरीचे आहे.

ही पुस्तके / ग्रंथ शोधताना माझ्या मनात नगरपालिका वाचनालय व तेथील ग्रंथपाल यांच्याविषयी असणारे गैरसमजही दूर झाले. एखाद्या ग्रंथपालाला जर आपण सहकार्याची (मदतीची) विनंती केली तर तो आपल्याला हवी ती मदत आनंदाने करतो याचाही प्रत्यय आला.

### १) काही उपेक्षित कुरुस्त्रिया

लेखक : प्रभाकर वैद्य

प्रकाशक : शुभा प्रकाशन (Out of Print)

महाभारतकालीन 'पितृसत्ताक संस्कृती'मुळे स्त्रियांना दुय्यम स्थान होते. त्यातही जर ती स्त्री निपुत्रिक असेल, तर तिचा उल्लेख धर्मकार्यातील नोंदीपुरताच केला जाई.

समाजात विशिष्ट दर्जा असणाऱ्या परिवारातील स्त्रियांपेक्षा प्रतिष्ठेत कमी पडणाऱ्या वर्गातील स्त्रिया अधिक धीटपणे वागतात आणि जीवनातील समस्यांना आत्मविश्वासाने सामोऱ्या जातात. हा महाभारतातील अनुभव आजही येतो. त्यांच्या तेजस्वीपणाचा गाजावाजा होत नसेल, पण त्यांचे आयुष्य सर्वस्वी शरणांगतांचे नसते. हिडिंबा, चित्रांगदा यांनी दास्यत्व पत्करले नाही. पुत्रजन्मापर्यंत परस्पर प्रेम आणि संमती यांनाच आधार मानले. या दृष्टीने या स्त्रियांचे वेगळेपण दाखविले आहे. लेखकाचे आभार मानले पाहिजेत.

थोडक्यात, काही उपेक्षित स्त्रियांकडे, त्यांनी निर्माण केलेल्या सांस्कृतिक संबंधाकडे आणि त्यातूनच निर्माण झालेल्या संघर्षाकडे महाभारताच्या वाचकांचे लक्ष वेधण्याचे लक्षणीय कार्य करून श्री. प्रभाकर वैद्य यांनी महाभारतावर निराळा प्रकाश टाकला.

**पुस्तकातील कुरुस्त्रिया -**

१) गंगा

२) धीवरकन्या सत्यवती

३) राजमाता सत्यवती

४) सासु सत्यवती आणि तिच्या सुना
५) सत्यवतीविषयी आणखी थोडेसे
६) सत्यवतीच्या नातसुना
७) सत्यवतीच्या तीन नातसुनांच्या विवाहाच्या तीन तऱ्हा
८) शतपुत्रवती गांधारीच्या भाग्याचे फलित
९) शाश्वत दुःखाचे वरदान लाभलेली कुंती
१०)मृगयासक्त पांडुराजाला स्त्री-संग-मृत्युचा शाप
११)वेदनेचे वरदान मागणारी कुंती
१२)हिडिंबा : दाने संस्कृतीच्या सीमारेषेवरची प्रणयकथा
१३)द्रौपदीची विटंबना कोणी केली?

### २) पारिजात
काही निवडक लघुनिबंधांचा संग्रह

संपादक : वि. स. खांडेकर
प्रकाशक : कॉंटिनेंटल प्रकाशन, पुणे
आवृत्ती : १९५२
किंमत : तीन रुपये

या पुस्तकामध्ये ना. सी. फडके, अनंत काणेकर, वि. स. खांडेकर, वि. पां. दांडेकर, ना. मा. संत, गो. रा. दोडके, कुसुमावती देशपांडे, वि. ल. बर्वे यांचे लघु निबंध दिलेले आहेत.

या संग्रहात 'शिव्या', 'नवा खिसा', 'कुहुऽऽकुहुऽऽ' हे खांडेकरांचे तीन निबंध घेतले आहेत. हे तीनही निबंध कल्पनेशी क्रीडा करीत करीत निबंध फुलविण्याची त्यांची पद्धत. त्यांची विनोददृष्टी, त्यांच्या लघुनिबंधाची भाषा वगैरेवर सहज प्रकाश टाकू शकतील असे आहेत.

वि. पां. दांडेकरांची भाषा प्रसन्न व लघुनिबंधाला अनुरूप आहे. या प्रसन्न भाषेच्याद्वारे लेखकाचे जे व्यक्तिमत्त्व प्रकट होते तेही जितके वैचित्र्यपूर्ण तितकेच आकर्षक आहे. ना. म. संतांच्या लघुनिबंधात प्रसन्न व प्रवाही भाषा, सुटसुटीत मांडणी इ. गुणांमुळे निबंध आकर्षक वाटतात. दोडके यांचे लघुनिबंध वाचताना पुस्तकांवर अपत्याप्रमाणे प्रेम करणाऱ्या एका श्रेष्ठ रसिकांशी आपण गप्पागोष्टी करीत आहोत असे वाटते.

पुस्तकाच्या शेवटी पुस्तकातील काही शब्दांचे अर्थ सांगणारे संदर्भ शब्द (संदर्भ टीपा) दिल्या आहेत.

### ३) महाराष्ट्र संस्कृती
घडण आणि विकास

लेखक : प्र. न. देशपांडे, ह. श्री. शेणोलीकर
प्रकाशक : मोघे प्रकाशन, कोल्हापूर.
आवृत्ती : २५ डिसेंबर, १९७२
किंमत : बावीस रुपये

या पुस्तकामध्ये महाराष्ट्र संस्कृतीच्या इतिहासाची (प्रारंभापासून १८८५ पर्यंत) माहिती दिलेली आहे. मराठी साहित्याचा अभ्यास करून एम्.ए. करणाऱ्या विद्यार्थ्यांना साहित्याच्या इतिहासाबरोबरच महाराष्ट्राचा भूगोल व इतिहास, राजकारण, समाजकारण, धर्मविचार, महाराष्ट्रातील कला, क्रीडा आणि मराठी मन इत्यादींचा चांगला परिचय व्हावा हा या पुस्तकाचा मुख्य हेतू आहे.

पुस्तकाच्या सुरुवातीच्या पानांमध्ये यादवकालीन दक्षिण भारत, शिवाजीचा राज्य विस्तार, पेशवेकालीन भारत इ. नकाशे दिलेले आहेत. नंतरच्या काही पृष्ठांवर महाराष्ट्रातील काही कुलदेवतांची चित्रे दिलेली आहेत (अंबाबाई मंदिर, कोल्हापूर श्री मल्हारी मार्तंड, जेजुरी) तसेच महाराष्ट्रातील काही प्रसिद्ध क्षेत्रांची चित्रे (देवगिरी किल्ला, लेण्याद्री, वेरूळ, शनिवार वाडा, आळंदी) दिलेली आहेत.

सुरुवातीच्या प्रकरणांमध्ये संस्कृतीविषयी माहिती दिलेली आहे. संस्कृतीची व्याख्या करताना लेखक म्हणतात, 'संस्कृती म्हणजे मानसिक उन्नतीचा दर्शक असा जीवनक्रम किंवा आदर्श वर्तन पद्धती'.

या नंतरच्या प्रकरणांमध्ये यादवांचे साम्राज्य,

यादवकालीन तत्त्वविचार, महाराष्ट्रातील दैवते, शिवाजी आणि शिवकाल, पेशवाई, महाराष्ट्रातील कला, क्रीडा आणि साहित्य इत्यादी गोष्टींची माहिती दिलेली आहे.

पुस्तकाच्या शेवटी संदर्भ ग्रंथांची सूची दिलेली आहे.

### ४) हरिभाऊ

(कै. हरि नारायण आपटे यांच्या सर्व उपलब्ध वाङ्मयाचा कालानुक्रमी अभ्यास)

लेखक : डॉ. ल म. भिंगारे
प्रकाशक : स्कूल व कॉलेज बुक स्टॉल, कोल्हापूर
आवृत्ती : १९५६
किंमत : दहा रुपये

पुस्तकातील पहिल्याच उपन्यास या प्रकरणामध्ये हरिभाऊंच्या 'गड आला पण सिंह गेला !!!', 'उष:काल', 'रूपनगरची राजकन्या' इ. कादंबऱ्यांचा उल्लेख लेखकाने केला आहे. हरिभाऊ हे मराठीतील कालानुक्रमे पहिले तसेच गुणानुक्रमेही इंग्रजी राजवटीच्या वाङ्मयेइतिहासातील पहिलेच कादंबरीकार आहेत.

नंतरच्या प्रकरणांमध्ये हरिभाऊंच्या जीवनाविषयी माहिती दिलेली आहे. (जन्म ८ मार्च १८६४ खानदेशात) हरिभाऊंचे बालपण, शिक्षण या विषयीची माहिती येथे दिलेली आहे.

चौथ्या प्रकरणापूर्वी परीशिष्ट २ मध्ये हरिभाऊंच्या जीवनातील महत्त्वाच्या घटना सांगितल्या आहेत. चौथ्या प्रकरणामध्ये 'म्हैसूरचा वाघ' या कादंबरीची चर्चा, 'गणपतराव' या अपूर्ण कादंबरीचा विचार, १८८६ ते १८९३ या कालात हरिभाऊंनी कानिटकर दांपत्याला लिहिलेल्या पत्रांचा उल्लेख आहे. परीशिष्ट ४ मध्ये १८९१ ते १८९९ या काळातील हरिभाऊंच्या लेखनाची यादी दिलेली आहे. परीशिष्ट ५ मध्ये इ. स. १९०० ते १९०८ या काळातील हरिभाऊंनी लिहिलेल्या लेखांची यादी दिलेली आहे.

शेवटच्या प्रकरणामध्ये हरिभाऊंचे सामर्थ्य आणि उणिवा, हरिभाऊंची श्रेष्ठता तसेच त्यांच्या दुर्मिळ वाङ्मयाबाबत एकत्र माहिती दिलेली आहे.

### ५) चक्रव्यूह

लेखक : डॉ. गिरिश आफळे
प्रकाशक : ज्ञान प्रबोधिनी प्रकाशन, पुणे
प्रथम आवृत्ती : १९९०
किंमत : ऐंशी रुपये

कुष्ठरोग शारीरिक दृष्ट्या एकाला होतो तथापि मानसिक दृष्ट्या इतरांना होतो आणि त्यांची प्रतिक्रिया रोग्याला त्रासदायक होते. म्हणूनच कुष्ठरोगाविषयीचे अपसमज दूर करण्यासाठी समाज प्रबोधन करणे आवश्यक आहे. यासाठीच डॉ. गिरीश आफळे यांनी काही सत्यकथा येथे सांगितल्या आहेत.

कुष्ठरोगी - आश्रम असे समीकरणच लोकांच्या मनात ठसले आहे. परंतु आश्रमात न जाता घरच्या घरी रोगी इलाज करून घेऊ शकतात. कुष्ठरोग्यांपैकी फक्त २०% रोग्यांपासूनच संसर्ग होऊ शकतो. इतर रोग्यांपासून समाजाला काहीही धोका नाही हे लोकांना पटवून देण्याचा मुख्य हेतु या पुस्तकात दिसतो.

**लेखकांविषयी थोडेसे :-**

डॉ. गरीश आफळे यांनी कर्जत येथील ग्रामीण सर्वंकष आरोग्य योजनेत साडेपाच वर्ष वरिष्ठ कुष्ठरोग तज्ज्ञ म्हणून काम केले आहे.

**वैशाली जोशी.**
डोंबिवली

•••

# स्वच्छता

*स्वच्छता ! ह्या महत्त्वाचा पारंपारिक विषय या संस्कारां बद्दल - संपादक*

हा एक संस्कार आहे. तो अंगी असालयाच हवा. शारीरिक स्वच्छतेच्या आपण सर्व गोष्टी जाणतोच पण आपण ज्या वास्तूत राहतो त्यासाठी स्वच्छता राखणे आपलेही कर्तव्य असते. घर कसे शांत, मंगल, प्रसन्न, नीटनेटके दिसायला हवे. घर लहान असले तर स्वच्छ व नेटके हवे कपडे जुने असले तरी ते स्वच्छ असावेत.

रस्त्यावरचे चौकातले पुतळे, जयंती पुण्यतिथीला स्वच्छ केले जातात. त्याच्या आजूबाजूचा परिसर तेवढ्यापुरताच स्वच्छ केला जातो. त्याऐवजी घाण होणारच नाही याची आपण काळजी घ्यायला हवी.

स्वच्छता हे एकट्याचे काम नाही याबाबत जागरुकता असायला हवी. शाळेत डबा खाताना उष्टे हात इथे-तिथे लावणे, अन्न सांडणे, बेन्च खराब करणे इत्यादी गोष्टी दिसतात तशा कार्यालयातही दिसतात. बरेच लोक कचऱ्याचा डबा शेजारी असूनही कचरा खिडकीतून बाहेर फेकतात. कितीतरी इमारतींच्या जिन्यांचे कोपरे पानांच्या पिचकारीने लाल झालेले दिसतात. खालून कोणी जात असेल, त्याच्या डोक्यावर कचरा पडेल याचा विचारही केला जात नाही.

कचराकुंडीबद्दल एक गोष्ट लक्षात येते. लोक कचरा घेऊन तिथपर्यंत जातात पण तो कुंडीत न टाकता बाहेरच टाकतात. मग तो रस्त्यापर्यंत पसरवण्याचे काम गुरे आणि प्लास्टिकवाले करतच असतात.

रेल्वे प्लॅटफॉर्मवर सिगारेटची थोटके, प्लास्टिकच्या पिशव्या, गुटख्याची रिकामी पाकिटे फेकलेली दिसतात. तो कचरा काही प्रमाणात गोळा केला जातो तर काही रुळांवर टाकला जातो आणि पहिल्याच पावसात यामुळे गटारे तुंबून पाणी साचते.

आज आपण अनेक प्रकारच्या भयानक रोगांचा सामना करत आहोत. आपण शहरात राहता तरी बऱ्याच जणांना मलेरिया होतो म्हणजे स्वच्छतेचा अभाव आहेच.

गाडीत प्रवास करताना लोक खाद्यपदार्थ बरोबर नेतात आणि त्याचा कचरा, कागद सर्व सीटखाली टाकून मोकळे होतात. गाडीत चपलेचे पाय समोरच्या सीटवर ठेवू नका अशी सूचना असली तरी कोणी त्याची दखल घेत नाही.

नाट्यगृहे, चित्रपटगृहे यातही लोकांची स्वच्छतेबाबत उदासीनता दिसून येते. यामुळेच रोगराई पसरते हे त्यांच्या लक्षातच येत नाही.

एका परदेशातल्या फिल्ममध्ये त्यांनी दाखवले स्वच्छतागृहाचा वापर करून झाल्यावर नळाचा वापर करून हात स्वच्छ धुतले तरच त्या स्वच्छतागृहाचा दरवाजा उघडतो.

स्वच्छतेने मन आनंदी राहते, प्रसन्न राहते. गाडगेमहाराज कोणी नमस्काराला आले की पाठीत झाडू मारत कारण समोर एवढी घाण असताना तुम्हाला हे सगळे करायला वेळच कसा मिळतो.

शरीर नुसते बाहेरून स्वच्छ असून चालत नाही ते आतूनही स्वच्छ व निर्मळ असावे लागते. स्वच्छतेबाबतचे धडे मुलांना लहानपणापासूनच आपण देत असतो. पूर्वीच्या पद्धती योग्य होत्या. बाहेरून आल्याबरोबर हात-पाय स्वच्छ धुवायचे. त्यामागे निरोगी आरोग्य होते. आता आजूबाजूला इतकी घाण आहे की स्वच्छतेचा नुसता धडा गिरवून चालणार नाही. 'स्वच्छ शहर, सुंदर शहर' हे कोणा एका

(पान नं. २१ वर)

# सान्ताकडून अनंताकडे निघालेली 'पालखी'

*या महिन्यातील ग्रंथालय सप्ताहाचे औचित्य लक्षात घेऊन हा आणखी एक ग्रंथाचा परिचय. - संपादक*

(पालखी - (काव्यसंग्रह) प्रा. उषा लिमये, शारदा प्रकाशन, ठाणे, पृष्ठे - ७९ मूल्य - ८० रुपये) (स्त्री, वसंत, वाङ्मय शोभा, सह्याद्री, दीपावली इ. मासिकातून व प्रसिद्ध नियतकालिकातून प्रसिद्धी)

'विसावा' या १९५५ मध्ये प्रसिद्ध झालेल्या (वि.स.खांडेकरांची प्रस्तावना) काव्यसंग्रहानंतर (प्रदीर्घ विसाव्यानंतर) अलिकडेच वयाच्या ऐंशीव्या वर्षी प्रसिद्ध झालेला हा कवयित्रीचा दुसरा काव्यसंग्रह. उषा लिमये या विदर्भातल्या ज्येष्ठ कवयित्री. इंदिरा, संजिवनी, .. शांता शेळके यांच्या पिढीतल्या, समकालनी कवयित्री. संसार मुलेबाळे सांभाळून उशीराने शिक्षण घेऊनही एम्.ए. (मराठी) प्रथम वर्गात प्रथम, वेहेरे सुवर्ण पदाच्या मानकरी. माजी संरक्षण मंत्री यशवंतराव चव्हाण ह्यांच्या हस्ते पुरस्कार प्राप्त. १९६४ ते १९८३ पर्यंत नागपूरच्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर महाविद्यालयात मराठी विभाग प्रमुख.

'विसावा' संग्रहामुळे सर्वांस परिचित झालेल्या उषाताईंचे 'निवेदन रामायण' स्वागत नाट्यशैलीतले ललित गद्य पुस्तक. यांच्या अनेक गाजलेल्या प्रयोगांमुळे त्या जास्त लोकप्रिय झाल्या. 'गीत गजानन' ही यांची आणखी भक्तीगीत रचना. त्याची द्वितियावृत्ती नुकतीच प्रसिद्ध झालेली आहे. महाराष्ट्रात त्याचे हजारावर प्रयोग झाले आहेत व होत आहेत. AIR - 65 च्या त्या आकाशवाणीच्या कवयित्री आहेत. त्यामुळे त्यांची भावगीते भक्तीगीते लोकांना सुपरिचित आहेत. आकाशवाणी, दूरदर्शनवरून कविसंमेलनाचे संचालन व गावोगावी कविसंमेलनात सहभाग. 'दारी याचक उभा' ही HML ची ध्वनिमुद्रिका. 'रक्ताने न्हाली इतिहासाची पाने' या कवितेला शासनाचा पुरस्कार प्राप्त. 'इरिंग मिरींग लोंगा तिरींग' हा बालकुमारगीत संग्रह, 'पाळण्यापासून पाळण्यापर्यंत' ही पुस्तकेही शारदा प्रकाशन तर्फे प्रसिद्ध.

'पखाली' व्यक्तिचित्रणे, 'अग्निदिव्य', अहिल्याबाई होळकरांच्या जीवनावर कादंबरी 'समिधा' वंदनीय मावशी केळकरांवर कादंबरी, 'गा कोकिळा गा' भावगीत, भक्तीगीत संग्रह, 'चांदोबा, वाघोबा, ससोबा' बालगीत संग्रह प्रकाशनाच्या वाटेवर आहेत.

बाईंनी गद्य लिखाण केले असलं तरी त्यांचा मूळ पिंड कविचाच. लहानपणापासून लेखनाला सुरुवात. 'पालखी' काव्यसंग्रहात काव्यविषयक कविता, प्रेमकविता, निसर्ग कविता, मृत्यूविषयक कविता निरनिराळ्या छंदात, वृत्तात, मुक्तछंदात लिहिलेल्या आहेत. वरवर काव्याचे असे वर्गीकरण केले तरी त्यांच्या सर्वच जवळपास कवितांना अध्यात्म्याचा डुब आहे. 'पालखी'चे यथार्थ चित्रण केलेले आकर्षक मुखपृष्ठ, मलपृष्ठावर 'विस्तव्याचे' अभिप्राय. सुस्पष्ट सुरेख छपाई असे हे शारदा प्रकाशन, ठाणे याचे दिमाखदार व दर्जेदार असे काव्याचे पुस्तक आहे.

'विसावा'बद्दल वि.स.खांडेकर यांनी म्हटल्याप्रमाणे साधी, सोपी अर्थवाही, प्रसन्न शैली, मऊ मऊ वाळूवरून मजेत चालावं कुठेही क्लिष्टतेचा काटा, अनुचित शब्दांचा खडा टोचायचा नाही. एखाद्या पुष्करिणीच्या काठी बसून तिच्या स्वच्छ पाण्याचा तळ पहावा तसा या काव्यातील आशयाचा आस्वाद वाचक घेऊ शकतो. अगदी हाच अभिप्राय त्यांच्या 'पालखी'

बद्दलही (खांडेकर असते तर) त्यांनी दिला असता आणि रसिक वाचकांना तशीच अनुभूतीही आल्याशिवाय राहणार नाही. या संग्रहात रसिकांना कौटुंबिक सौहार्दाच्या, वात्सल्य, जिव्हाळा या जाणिवांच्या काव्यविषयक सामाजिक मनाच्या अभिव्यक्तीच्या ऐतिहासिक पार्श्वभूमीच्या अभिनिवेषाच्या तसेच सान्ताकडून अनंताकडे जाण्याची तीव्र ओढ लागलेल्या पारमार्थिक कविता आढळतील.

जीवनाचा जोडीदार नको बाई कोणी मोठा
नको अमृताचा प्याला कधी लागावया ओठा
जीवनाचा जोडीदार हवा साधाच माणुस
सोने करील जन्माचे ज्याच्या प्रेमाचा परीस !

- जीवनाचा जोडीदार

ही कविता काय किंवा 'माझ्या घरीही येणार' पहा-

नको लपवू कलिका । पानाआड ग वल्लरी
नाही पडायची माझी । दृष्ट तुझ्या बाळावरी
नको चोरू माझ्यापुढे । उरी दाटलेला पान्हा
माझ्या घरीही येणार । आता गोकुळीचा कान्हा

किंवा

ती 'गीता' वाचित असता ही 'गीता' भवती असते
उद्बोधन श्रीकृष्णाचे शब्दात तिच्या अवतरते ॥

ती म्हणते स्थिर हो येथे ही म्हणते जाऊ भूरऽऽ
ह्या जवळीकेतच जाते मी साध्यापासून दूर
परि हिच्यात श्रीकृष्णाचे मज सदैव दर्शन घडते ॥

या अशा कौटुंबिक कवितांनाही प्रपंच व परमार्थ हातात हात घालून नांदतांना जाणवतात.

त्यांच्या काव्यविषयक कविता अनेक आहेत. उदाहरणे घ्यायचीच झाली तर - शब्दाविना

जिथे थांबतसे । ओघवती वाणी
तिथे मी लिहिते । आसवांनी गाणी ॥

जिथे लोपतसे । माझाच मी पणा
तिथे मात्र सारे । सारे शब्दाविना ॥

पहिलीच 'समाधी' कविता पहा -

मी माझी असते अन् मी माझी नसतेही
शब्दांच्या मायेने भावब्रह्म फसतेही ॥

त्यानंतर 'आसवांच्या अक्षरांनी' पहा -

लिहायचे होते किती अनवाणी अक्षराला
उमटेना शब्द एक रुप शब्दाचे येईना
अंधाराच्या आवरणी अंतरीच्या आकान्ताचे
परी सुख हे क्षणिक प्रतिबिंब उमटेना

'तेव्हा दिसे डोळा' ही पण अशीच अप्रतिम कविता-

लेखणीचे बळ
शब्दाची शिकार
करात ओंकार
वसे माझ्या ॥

भाववेडे मन
क्षण आतुरते
विश्व ही आत्मते
शब्दाविण ॥

'स्वप्न अनोखे' मधे

स्वप्न अनोखे असे उशाशी
भाव मधुरसे ओठी अडता
मूक होतसे वाणि परंतु
लिही लेखणी सुंदर कविता ॥

'साक्षात्कार' या कवितेत -

कुठली शक्ती करातुनी या भाव अनोखे विणते
शब्द, भाव, लेखणीसवे
मी स्वत:च कविता बनते ॥

त्यांची 'अशी एकदा लिहीन कविता' पहा-

अशी एकदा लिहीन कविता
जी विश्वाची बनेल शिक्षक
जिचे अध्ययन करण्यासाठी
गुरुत्वही होईल समीक्षक ॥

कविता वाचायला सुरुवात करता क्षणीच या कवितेवर आद्य जेष्ठ श्रेष्ठ असे आधुनिक मराठी कवितेचे शिल्पकार बा.सी.मर्ढेकर यांच्या 'इरेस पडलो तर बच्चमजी मुक्तछंद तर लिहीन मीही' या कवितेची छटा दिसून येते.

आजच्या युगातल्या 'स्त्रीमुक्तीवादी', 'स्त्री पुरुष समानता'वाल्या 'स्त्री स्वातंत्र्याचा टेंभा मिरवणाऱ्या आजच्या 'स्त्री'चे चित्रण त्यांच्या 'मी कोण' ह्या कवितेत यथार्थपणे उतरले आहे.

मी कोण कुणास ठाऊक मलाच कळलं नाही
मला स्त्री म्हणतात पण स्त्रीत्व बसले हरवून
सौंदर्याचा शापही उ:शापाने सरवून
आठ वीसची लोकल पकडते जिवाचं करून रान
शालिनतेच्या सावित्रीने ताठ केलीय मान
संसाराचा रथ सावरीत पुरुषांबरोबर धावल्येय
उत्साहाचा उरुस सारा उरात जिरून जातोय
थकल्या भागल्या देहामधे त्राणच उरलं नाही ॥

शेवटी कवितेला अध्यात्मिक कलाटणी -

कर्तव्याला कैवल्याची, कुठलीच जाणीव नाही
मी कोण सांगायला मीच उरले नाही
मी कोण कुणास ठाऊक मलाच कळलं नाही ॥

.. अनंताची ओढ, जीवाला शिवाची ओढ, आत्म्याला परमात्म्याची ओढ त्यांच्या अनेक कवितातून उत्कटतेने, प्रकर्षाने, आर्ततेने जाणवते.

'एकच मागणे'
शिशीराची पानझड गळे एक एक पान
तसा गतस्मृतींचाही धावे एक एक क्षण ॥

सुख दु:खाचा गुंफला असा एक एक धागा
तुझ्या अंकावर आता हवी कायमची जागा
भक्त भागवता हवे आता मोक्ष सिंहासन ॥

'बंधन' -

अंधाराची कारा येथे ।
मला प्रकाशाची आस
इथे सांताची शराव । मला अनंताचा ध्यास ॥

'शाप' - आजच्या विज्ञानयुगातला मानव अणुशक्तीचे अस्त्र घेऊन स्वत:चाच नाश करायला निघाला आहे. विज्ञानाला शाप की वरदान म्हणायचे हा प्रश्न पडलाय मानवासमोर !

सुसंस्कृतीचा वरी मुखवटा
स्वार्थ द्वेष परि मनी विवस्त्र
विध्वंसाया विश्व निघाला
अणुशक्तीचे घेऊन अस्त्र ॥

'तोवरी कृतान्त टाक आपुले पाश' हे मृते तू त्याचवेळी ये जेव्हा

जोवरी विभव रवि माध्यान्ही आलेला
कीर्तिचा चंद्रमा झळकतसे पुनवेला
आहोट जोवरी लागली न सुयशास ॥

(तोवरी कृतान्ता टाक - आपुले पाश)

कवि भा.रा.तांबे यांच्या 'नववधुप्रिया मी बावरते' या कवितेतील मृत्यूला प्रियकर समजण्याची कल्पना व जीव

हा नववधु अशा मृत्यूविषयक अनेक प्रेमकविता 'पालखी'त आढळतील त्यापैकी 'तुला मला जाग यावी'

तुला मला परी सख्या
जाग यावीच कशाला
झोपू असेच घेऊन
स्वप्न शर्वरी उशाला ॥

'शेवटची इच्छा' मधे त्या म्हणतात -

येतोस ना? मी वाट पहाते
तुझ्या अलौकिक मिठीत येतोस ना ?
मी वाट पहाते ॥
भैरव सला सरे भैरवी
उमा यावरी यायचा रवी
शब्द सुराविण गीत तुझे गातोस ना?
मी वाट पहाते ॥
'तुझी माझी प्रीत' -
तुझी माझी प्रीत सख्या
विश्वाच्याही पल्याडची
साऱ्या वैश्विक वैभवा
भीती प्रलय काळाची ॥

'नवा उमलला अर्थ' -

सागराची लाट निघे उंच नभाला भिडाया
तिच्याहून झेप माझी राया तुझ्याकडे याया
वारा वाहता वाहता त्रैलोक्याशी जोडी नाते
तुझी विश्वात्मक शक्ती माझ्या आत्म्यात नांदते ॥

या संग्रहातील 'पालखी' ही अखेरची शीर्षक कविता. 'साळुंकी साळकी तुझी माझी पालखी' हा खेळ मंगळागौरीतला. अविद्या व माया (दोन मुली हा खेळतात.) हा खेळ गिरक्या घेत तल्लीनतेने खेळत आहेत -

तू मी दोघीजणी आहो तरी दोन का?
चुटक्या एका एकी आला नवा कोन का?

चुटक्या वाजवीत गिरक्या घेत पालखी पुढे जात आहे.

कुणी म्हणतात काय जाणे तुझे माझे नाते आहे
प्रकाशाच्या प्रासादात भिंगरीसारख्या फिरत आहो
उन्मादाच्या बेहोषीत अनंतात विरत आहो
क्षणामधे मूक होते वागीश्वरी बोलकी ॥

'घट म्हणजे ही केवळ माया', 'आता न सांगण्या उरले', परि 'तेव्हा दिसे डोळा', 'रक्ताने न्हाली इतिहासाची पाने', 'संसाराचा रथ', 'ॐकार' कशी 'गीच', 'प्रीतीचे आकाश माझे' इ. अनेक अप्रतिम कविता यात आहेत. त्यासाठी रसिक वाचकांनी 'पालखी' काव्यसंग्रह वाचावयासच हवा. तो अल्लद पावले थिरकवित 'पालखी'बरोबर जाता जाता चालण्याचे श्रम न जाणवता एका वेगळ्या अनंताच्या अनोख्या विश्वात नेऊन सोडील...

**आशा भिडे**

बी/१, विजय अपार्टमेंटस्,
'आराधना' टॉकीजजवळ,
ठाणे (प.) - ४०० ६०२.
दूरध्वनी : २५४१ ०१४०



# बालसंगोपन या विषयावरील उपयुक्त पुस्तक 'आपलं बाळ'

*'आपलं बाळ' या बालसंगोपनावरील नवीन पुस्तकाचा परिचय. - संपादक*

ठाण्यातील एक बालरोग तज्ज्ञ डॉ. सौ. प्रभा कर्वे यांचे 'आपलं बाळ' हे मराठीत आलेले बालजन्म व संगोपन शास्त्र या विषयांवरील पुस्तक लहान मूल असणाऱ्या नूतन मातापित्यांना उत्तम मार्गदर्शन असू शकेल असे आहे.

डॉ. सौ. कर्वे यांनी नेटकेपणाने आपली भूमिका प्रस्तावनेत मांडली आहे. त्या म्हणतात, 'लहान मुलांचे आरोग्य चांगले कसे राहील, ते बिघडले, त्यांना अपाय झाल्यास त्यावर उपाय काय करावेत, आजार होऊ नयेत म्हणून काय काय खबरदारी घ्यावी, मुलांना सकस आहार कसा मिळेल की, ज्यायोगे त्यांची वाढ योग्य रीतीने होईल. अशा तऱ्हेचे शिक्षण सर्व सामान्य पालकांपर्यंत पोहचवावे, यासाठी केलेला हा प्रयत्न.

अशा स्पष्ट भूमिकेतून व लोक शिक्षणाचा हेतू बाळगून पुस्तक लिहिलेले असल्याने ते अतिशय सोप्या भाषेत आहे. वैद्यकीय परिभाषेचा शक्य असेल तेथेच उपयोग केला आहे. आज वैद्यकीय विषयांवरील असे साहित्य ही घराघराची गरज ठरत आहे. पूर्वीच्या काळात वडिलधाऱ्यांचे मार्गदर्शन व वेळप्रसंगी मदतही मिळत असे. पण आजी-आजोबांबरोबरच आजीबाईंचा बटवाही घराबाहेर पडला आणि नवपालकांनी बाळाचे आरोग्य ही काळजी वाटावी अशी बाब झाली.




या पार्श्वभूमीवर डॉ. प्रभाताईंचे पुस्तक घरात महत्त्वाचे मार्गदर्शन करू शकणार आहे.

पुस्तकाची निर्मितीही चांगली आहे. वापरलेला कागद, टाईप, मुखपृष्ठावरील चि. मीनल कर्वे हिचा हसतमुख फोटो, उत्तम मुद्रण, पुस्तकातील आकृत्या व छायाचित्रे ही देखील सहाय्यकारी आहेत.

मूल होण्यापासून ते शाळेत जाईपर्यंतच्या म्हणजे तीन-चार वर्षांपर्यंतच्या बालविकासाचा विचार यात आहे. एकूण ३८ छोटी छोटी प्रकरणे आहेत. कावीळ, आकडी, गोवर, कांजिण्या यांबरोबरच मुलांना होऊ शकणाऱ्या क्षयरोग, पंडु रोग, पोलिओ असे रोग होऊ नयेत व झालेच तर काय करावे याचे मार्गदर्शन यात आहे. प्रकरण २१ (पर्यावरणाचे महत्त्व), २४ (झटपट दवा) अशी पालकशिक्षण करणारी प्रकरणे या पुस्तकाचे वैशिष्ट्य म्हणून सांगता येतील.

या पुस्तकाची उपयुक्तता वाढण्याच्या दृष्टीने ठाण्यातील (ठाणे-मुंबईतील) प्रसिद्ध बालरोगतज्ज्ञांची सूची, दूरध्वनी क्रमांक दिले असते तर अधिक चांगले झाले असते, त्याचप्रमाणे निर्देश सूची, मराठीत उपलब्ध असणाऱ्या याच विषयावरील इतर महत्त्वाच्या पुस्तकांची सूची, अशा परिशिष्टात देता येण्यासारख्या।

साहित्यामुळे पुस्तक अधिक उपयुक्त ठरले असते. अर्थात या त्रुटी पुढील आवृत्तीत दूर करता येणे सहज शक्य आहे.

पुस्तकाच्या मलपृष्ठावर लेखिकेचे छायाचित्र, माहिती असावयास हवी होती असेही जाणवले.

या त्रुटी असूनही वर म्हटल्याप्रमाणे वैद्यकीय माहिती, भाषा व अनेक प्रकरणांचा समावेश असून पुस्तकाची उपयुक्तता वाढली आहे. मुख्य म्हणजे सर्वसामान्य घरातील कोणत्याही मातापित्याचा दृष्टीने या पुस्तकाचा उपयोग महत्त्वाचा आहे.

> ***आपलं बाळ***
>
> लेखिका/प्रकाशिका -
> डॉ. सौ. प्रभा जयंत कर्वे, ठाणे
>
> पृष्ठ १०४, मूल्य रु. ६०/-
>
> अधिक माहितीसाठी / पुस्तकासाठी संपर्क:
>
> **डॉ. सौ. प्रभा जयंत कर्वे**
> शांता निवास, कर्वे हॉस्पिटल समोर,
> म. गांधी पथ, नौपडा, ठाणे - ४०० ६०२.
> दूरध्वनी : २५४०६०६३

**मोहन पाठक**
ग्रंथपाल,
बांदोडकर विज्ञान महाविद्यालय,
ठाणे - ४०० ६०१.

•••

(पान क्र. २३ वरून पुढे चालू)

**स्वच्छता**

व्यक्तीचे काम नाही तर ते झाल्यावर तसे टिकवणे आपले काम असते.

विदेशात स्वच्छता ठायी ठायी दिसून येते. मग आपल्याकडेच अशी उदासीनता का? त्याचे कारण जाणून घेतले पाहिजे. आपण आपले घर स्वच्छ करायचे आणि त्यातील घाण रस्त्यावर टाकायची अशी मनोवृत्ती असून उपयोग नाही. तसे माणसाचे मनही स्वच्छ असावे, 'नाही निर्मळ मन, तेथे काय करील साबण'.

स्वच्छ सुंदर घर, शाळा, बाग, गाव, रस्ते, देश हे नुसतं स्वप्न असून चालणार नाही. त्यासाठी इच्छा, आवड, आस्था, कळकळ, तळमळ असायला हवी. कोणी खास व्यक्ती येणार असेल तर रस्ते दुतर्फा सुशोभित केले जातात इतरवेळी तेथे कोणी पहातही नाही.

खाताना स्वच्छ हात धुणे, पाणी देताना त्यात बोटे न बुडवणे, खोकताना-शिंकताना तोंडावर रूमाल धरणे, दवाखान्यात रुग्णाजवळ चप्पल घालून न जाणे, जेवताना अन्न न सांडणे, कपडे रोज स्वच्छ धुतलेलेच वापरणे, नित्यनेमाने घराची साफ सफाई करणे अशा रोजच्या जवळचा घटना असतात की एकमेकांचे हातरूमाल, टॉवेल न वापरणे गोष्टी तरी किमान पाळायला हव्यात.

शारीरिक स्वच्छता सोडली तर बाकीची स्वच्छता हे एकट्याचे काम नाही. म्हणजे वातावरण मंगल, प्रसन्न ठेवणे हे आपल्याच हाती असते.

**सौ. वंदना सं. प्रसादे**
ठाणे (पश्चिम).
दूरध्वनी : २५४० ०६६२

•••

# आर्थिक विकासाला राजकीय अडथळे

*कै. नी. गो. पंडितराव वक्तृत्व स्पर्धेच्या कनिष्ठ महाविद्यालय गटातील हे एक लक्षणीय भाषण. - संपादक*

आज स्वातंत्र्य मिळून ५७ वर्षे झाली. आमची पिढी स्वातंत्र्यातच जन्माला आली. स्वातंत्र्यानंतरच्या या ५७ वर्षांचा हिशेब मांडला तर आपली भली-बुरी प्रगती सहज लक्षात येते. पण स्वातंत्र्यपूर्व काळात.

अहो, पारतंत्र्यात आर्थिक विकास होऊच शकत नाही. कारण जेत्यांची मानसिकता ही लुबाडण्याची असते. याचे धडधडीत उदाहरण म्हणजे आपला देश की जेथे एकेकाळी सोन्याचा धूर निघत असे अशा आपल्या देशाचे इंग्रजांनी आर्थिक शोषण केले व विपन्नावस्थेला लावले. प्रचंड प्रमाणात आर्थिक पिळवणूक करून देशाची स्वयंपूर्ण ग्रामव्यवस्था नष्ट केली. त्यामुळे पारतंत्र्यात आर्थिक विकास होऊच शकत नाही. मात्र असे नव्हे की स्वातंत्र्य मिळाल्याबरोबर यक्षिणीची कांडी फिरल्याप्रमाणे प्रगती होईल. आर्थिक प्रगतीला लागते ते सुयोग्य आर्थिक नियोजन. आर्थिक नियोजन कागदावर कितीही आदर्श असले तरी ते वास्तवात उतरवताना अनंत अडचणी येतात याला इतिहास साक्षच आहे. नाहीतर रशियाकडून स्वीकारलेली 'पंचवार्षिक नियोजन पद्धती' पूर्णपणे यशस्वी होऊन आज आपण विकासाबाबतीत अमेरिकेला मागे टाकले असते पण दुर्दैवाने असे घडले नाही. आपल्या विकास योजनात अनेक अडथळे आले. आपली अनेक राजकीय धोरणे विकासाला मारक ठरली.

तात्त्विकदृष्ट्या सर्वांत चांगली राज्यपद्धती म्हणजे लोकशाही परंतु ती जर निरंकुश झाली तर तिची अवस्था मोकाट सुटलेल्या बैलाप्रमाणे होते. विरोधी पक्ष जर सत्ताधारी पक्षाला केवळ विरोधासाठी विरोध करण्यासाठी असेल आणि एकमेकांचे पाय खेचण्यासाठी असेल तर विकास योजनांचे खोबरे होते. एकमेकांवर अविश्वास दाखविल्याने मुदतपूर्व निवडणुका होतात. या निवडणुकांवर भरमसाठ खर्च होतो.



खनिजसंपत्तीने समृद्ध असूनही बिहार आज मागास आहे. याचे एक कारण त्याच्या भूतकाळात दडले आहे. मार्च १९६७ ते मे १९६८ या चौदा महिन्यांच्या कालावधीत बिहारमध्ये ४ सरकारे आली आणि गेली. विकासाचे तब्बल एक वर्ष वाया गेले. केंद्रात तर १३ दिवसांपासून ते १३ महिन्यांपर्यंत विविध कालावधींची सरकारे पहायला मिळतात. या मुदतपूर्व निवडणुकांमुळे आधीच्या सरकारच्या योजना बारगळतात व नवीन सरकार नवीन योजनांचा जन्म देते. त्यादेखील अशाच बारगळल्या जातात व काही योजनांवर ठोस निर्णय न घेतल्याने त्या बारगळतात.

याचे उत्तम उदाहरण म्हणजे सरदार सरोवर प्रकल्प की जो कित्येक वर्षांपासून रेंगाळला आहे. तो पूर्ण होऊन आजूबाजूच्या प्रदेशांना त्याचा फायदा व्हायला हवा होता पण फायदा दूरच इतके वर्ष काम रेंगाळल्यामुळे त्याचा खर्च हा मूळ अंदाजाच्या चौपटीने वाढला आहे.

सरकार जरी स्थिर असले तरी काही राजकीय डावपेचांमुळे आपण फुकटची दुखणी ओढावून

घेतली आहेत. १९६२ साली झालेले चीनबरोबरचे युद्ध हे फसलेल्या डावपेचांचे उत्तम उदाहरण आहे. 'हिंदी-चीनी भाई भाई' म्हणत चीनने आपल्या पाठीत कधी खंजीर खुपसला ते कळले नाही. त्या युद्धामुळे आपले करोडो रुपयांचे नुकसान झाले. 'एक युद्ध देशाला प्रगतीपथावरून २० वर्षे मागे नेते.' असे असताना चीन युद्धाची जखम भरली जात नाही, तोच बांगलादेशाचा प्रश्न उभा राहिला. या बांगलादेश युद्धात आपल्याला काय मिळाले ? उलट भरमसाठ युद्धखर्च झाला तो वेगळाच आणि १ कोटी निर्वासितांचा प्रश्न सोडवताना देशाची अर्थव्यवस्था खिळखिळी झाली. मानवतेच्या दृष्टिकोनातून जरी हा निर्णय कितीही चांगला असला तरी तो देशाच्या आर्थिक प्रगतीला मारक ठरला.

दिवंगत पंतप्रधान मा. इंदिरा गांधी यांनी घेतलेल्या आणीबाणीच्या निर्णयामुळे विकासाचा वेग मंदावला. मात्र आणीबाणी का लागू करावी लागली याचा शोध घेतल्यास असे दिसते की, २२ दिवसांचा रेल्वेचा देशव्यापी संप, गुजरातमधील आंदोलन, शेतकरी आणि गिरणी कामगारांचे न सोडवलेले प्रश्न आणि त्यामुळे चिघळलेली परिस्थिती याची परिणती आणीबाणीत झाली व त्याला राजकारण्यांची कुठल्याही समस्येवर तात्पुरती मलमपट्टी करण्याची वृत्ती जबाबदार ठरली.

दूरदृष्टीच्या अभावामुळे परराष्ट्रीय संबंधांचे कुचकामी धोरण विकासाला मारक ठरले. आपण रशियाशी मैत्रीचा करार केला खरा पण त्यामुळे दुसरी महासत्ता अमेरिका दुखावली गेली व तिचा व्यापारावर विपरीत परिणाम झाला.

राजकारण्यांनी अनेक धोरणे स्वीकारताना देशातील शेतीप्रधान अर्थव्यवस्थेचा विचार केला नाही, असे दिसते. नाहीतर आपण गहू आयात धोरण राबवलेच नसते. अहो ज्या देशाची गहू निर्यात करण्याची क्षमता आहे त्याने गहू आयात करावेत ?

ज्या क्षणी आपण 'उदार आयात धोरण' स्वीकारले त्यावेळी आपल्याला निर्यातवृद्धीची आणि पैंडी गंगाजळीत भर टाकण्याची गरज होती. पण अवेळी घेतलेल्या निर्णयांमुळे आपल्या अर्थव्यवस्थेचे नुकसान झाले.

गॅट करारानुसार खुले आर्थिक धोरण स्वीकारताना सरकार हे विसरतेय की देशातील लघुउद्योग बंद पडले आहेत. देशात बेकारी वाढतेय. लाल ड्रॅगनने आपली बाजारपेठ गिळंकृत केलेली असताना दुसऱ्यांना आपल्या बाजारात आमंत्रण देणे म्हणजे स्वत:च्या पायावर कुऱ्हाड मारून घेण्यासारखे आहे. यातच चलनफुगवटा केल्याचे रुपयाचे अवमूल्यन झाले. त्यामुळे महागाई वाढली. त्यामुळे देशातील सामान्य जनतेचे राहणीमान सुधारले नाही तर देशाची प्रगती कशी होणार ?

केंद्रात आणि राज्यांत असलेली विरोधी पक्षांची सरकारे ही राज्याच्या प्रगतीला मारक आहेत. विरोधी पक्षाच्या सरकारमुळे नकळत त्या राज्याविषयी दुजा भाव निर्माण होतो. याचे उत्तम उदाहरण म्हणजे प्रथम स्थानावरून घसरण झालेला आपला महाराष्ट्र.

राजकारण्यांचे एकमेकांत नसणारे सामंजस्य प्रगतीला घातक आहे, नाहीतर आज कावेरी प्रश्न सुटून कर्नाटक आणि तामीळनाडू यांचा अधिक विकास झाला असता.

आज आपण विज्ञानयुगात वावरले तरीही सरकारने कुंभमेळ्यासाठी १०० कोटी रु. मंजूर केले तो तर संपत्तीचा दुरुपयोग झाला. १०० कोटी रुपयात आपल्याला काय मिळाले तर चेंगराचेंगरीत मृत्यू !

एक गठ्ठा मतांच्या राजकारणाचा जेव्हा राजकारणी विचार करतात तेव्हा बहुसंख्य समाजाची कुचंबणा होते.


(पान नं. ३४ वर)

# दूरदर्शनवरील दीर्घकालीन मालिका - वास्तव / अवास्तव

*कै. नी. गो. पंडितराव वक्तृत्व स्पर्धेतील आणखी एक लक्षणीय भाषण. - संपादक*

दूरदर्शनवरील अर्थहीन दीर्घकालीन मालिका म्हणजे 'निव्वळ भ्रमाचा भोपळा' केवळ आपल्या धंद्याशी इमान राखणाऱ्या निर्मात्यांकडून ज्या प्रकारच्या विकृत मनोवृत्तीच्या मालिका टिव्हीवरून दाखविल्या जातात ते पाहून टी.व्ही. फोडून टाकावा असच वाटतं. पण काय करणार ? सहनशीलतेचा मुकुट डोक्यावर धारण करणाऱ्या भारतीयांनी टी.व्ही.कडून होणारा छळही सहन केल्यास त्यात नवल नाही.

धन्य तो टी.व्ही अन् धन्य तो छोटा पडदा. खरंच, टी.व्ही. कार्यक्रमाचं आजकालचं रूप पाहता त्याच नाव 'इडियट बॉक्स' किती सार्थ होते आता लक्षात येतं. घर उद्ध्वस्त करणाऱ्या टी.व्ही. मालिका पाहून देशातील जनतेला लालूच्या उपद्रवांनी पीडलेल्या जनतेसारखाच दुःखानुभव येऊ लागलाय. कारण बिहारात जशी लालूची तशीच करमणुकीच्या जगात या टी.व्ही. वाहिन्यांची जुलुमशाही नांदतेय.



अखेर स्त्री पात्राच्या माध्यमातून या मालिकांना नक्की काय सांगायचं असतं ? हे ना की स्त्रीला काय हवय? तिरस्कार, घृणा, विवशता, अवहेलना, प्रतारणा आणि विश्वासघात करून एकमेकांची मानहानी व निंदा, टवाळी करणारी कुटुंब, होय की नाही ? टी.व्ही. कुटुंब आणि प्रेक्षकांमध्ये रोज संध्याकाळपासून हे 'सोशल गेटटुगेदर' सुरू होते. अश्रू गाळणारी, अफवा पसरवणारी व एकमेकांची लफडी उखडून काढणारी ही टी.व्ही. कुटुंब आणि त्यांना आपल्या घरात स्थान देणारे प्रेक्षक या दोघांमध्ये एकमेकांबद्दलची सामाजिक बांधिलकी कुठेच दिसून येत नाही. या टी.व्ही मालिका निर्मात्यांच्या शब्दकोशात 'अशक्य' हा शब्दच जणू नसावा असे वाटते. कारण त्यांच्या सर्व कथांमध्ये अशक्य असं काहीच नसते मग ते कृत्य योग्य असो वा अयोग्य वास्तव जीवनाशी त्याच काही घेणं देणं नसतं. मात्र सत्य जर हवं असेल तर सगळ्या न्यूज चॅनलसवर अगदी १००% वास्तव तुम्ही पाहू शकता. कारण सत्य सांगावं हाच या न्यूज वाहिन्यांचा धर्म असतो.

त्यामुळे या न्यूज चॅनलचा बातमीदार दुर्घटना स्थळावर प्रत्यक्ष जाऊन तेथील संकटग्रस्त व्यक्तीला दुःखाच सविस्तर वर्णन करण्यास सांगतो, तेव्हा भयभीत झालेली आणि मनाने पार खचलेली ती व्यक्ती काय उत्तर देणार? पण तरीही भयानक वास्तवाचे चटके काही प्रमाणात जनतेनेसुद्धा अनुभवावेत. हाच सत्यदर्शनाचा हेतू असतो. परंतु टीव्हीवरील कोणतीही कौटुंबिक मालिका पाहून आपल्या डोळ्यांतून अश्रू ओघळले नाहीत अथवा एखाद्या पात्राला दोन-चार शिव्या हासडण्याचा जोश निर्माण झाला नाही तर टी.व्ही. पाहण्यात मजा ती कसली ?

म्हणूनच विविध मालिकांचे निर्माते प्रेक्षकांची ही भूक भागविण्यासाठी कौटुंबिक कहाण्यांचा चटपटीत घाट रोज संध्याकाळी सात वाजल्यापासून वाढायला सुरुवात करतात व दुसऱ्या दिवशी तोच शिळा पदार्थ पुन्हा सादर करतात. आश्चर्य म्हणजे तो शिळा फोडणीभात देखील घरची मंडळी आरामखुर्चीमध्ये अगदी पाय ताणून मिटक्या

मात्र चाखतात. या टी.व्ही मालिकांमधून दिसणारं प्रत्येक कुटुंब जणु एक प्राणीसंग्रहालय भासतं व त्यात वावरणाऱ्या व्यक्ती नीतिमत्ता नसलेल्या क्षुद्र प्राण्यासारख्या वाटतात. भव्य महालासारख्या उंच भिंती, प्रशस्त टेरेस, विस्तीर्ण वगीचा आणि अनेक ठिकाणी भलीमोठी प्रवेशद्वार असणाऱ्या या प्रासादात अशीही विकृत मनोवृत्तीची माणसं राहतात, जी केवळ बदला घेण्याच्या हेतूने एका अंध मुलीवर बलात्कार करतात. आता 'बलात्कार' किंवा इंग्रजी 'रेप' हे शब्द म्हणजे फक्त चार निर्जीव अक्षरांचे समूह नसून या शब्दांमागे दडलेल्या काटेरी वेदनांकडे कुणीच कधी वघणार नाही काय? म्हणूनच अशा प्रकारची दृश्य दाखवून समाजाला नेमका कोणता उपदेश करायचा आहे? स्त्रीला शिक्षा द्यायची असेल तर करा तिच्यावर बलात्कार, हाच तो उपदेश काय? व्वा रे पुरुषा, तुझा मर्दपणा!

आणखी एक बाब म्हणजे स्त्रीचा सर्वांत मोठा शत्रू दुसरी एक स्त्रीच असते हेच दाखविण्याचा आटापिटा या मालिका करत असतात. कदाचित बहुतेक मालिकांच्या निर्मात्या स्त्री असल्याचा हा परिणाम असावा. या मालिकांतून दाखविल्या जाणाऱ्या सुखवस्तू आणि समृद्ध अशा समाजात वावरणाऱ्या या तऱ्हेवाईक स्त्रिया येतात तरी कुठल्या जगातून आणि नंतर गायब कुठे होतात तेच कळत नाही. कमोलिका आणि पल्लवीसारख्या कटकारस्थानी भांडखोर सुना जर प्रत्यक्षात आपल्या घरात आल्या तर आपण स्वत:च उद्ध्वस्त झाल्याखेरीज राहणार नाही.

अशा मालिकांमधून दाखविल्या जाणाऱ्या अनेक घटना सहजपणे पचनी पडणाऱ्या अशा कधीच नसतात. शोध पत्रकारितेशी समरस झालेला वासू, इतरांच्या भानगडी खोदून काढतो पण स्वत:च्या घराला पडलेलं भगदाड मात्र त्याला दिसत नाही.

या मालिकांमधून गर्भपात इतका सहजपणे घडविला जातो, जणू झाडावरून फूल तोडावं. क्षणापूर्वी होतं ते क्षणात नाहीसं झालं. त्याचप्रमाणे दाम्पत्यामध्ये निर्माण होणारी कटुता, धुर्तपणा, फसवणूक या सर्व घटनांना प्रोत्साहन देण्याचं कार्य या मालिका गंभीरपणे करतात. या मालिकांमध्ये कौटुंबिक कलह इतके ताणलेले दाखवितात की घरातील दिवाणखाना, स्वयंपाकघर आणि वगीच्यांना जणु कारगीलच्या युद्धभूमीप्रमाणे स्वरुप येतं व कुटुंबातील प्रत्येक सदस्य 'लाईन ऑफ कंट्रोल' म्हणजेच आपल्या मर्यादा ओलांडताना दिसतो.

कौटुंबिक वातावरण प्रसन्न, निरोगी बनविण्याऐवजी येथील सर्व पात्रं एकमेकांना नामोहरम करण्याच्या प्रयत्नात दिसतात. सगळी स्त्री पात्र स्त्री, परंपराच्या चक्रव्यूहात अडकलेली दिसतात. खरं तर स्त्रीच्या विकासासाठी यातून बाहेर पडायलाच हवं म्हणून लोकांच्या मनात साचलेली ईर्ष्या व राक्षसी प्रवृत्तीला प्रोत्साहित करण्यापेक्षा यांच्यातील माणुसकी जागृत करणं ही आजच्या काळाची गरज आहे.

कथानक, कला आणि संस्कृतीच्या नजरेतून पाहता या 'इडियट बॉक्स'मध्ये बंदिस्त झालेली कुटुंब अहंकारापायी झुंजणाऱ्या व्यक्तिमत्वाचं दर्शन घडवितात हे चांगलं नव्हे. शिवाय यातील सगळी पात्र मोठ्या शहरांमध्ये वास्तव्य करणारीचं असतात म्हणजे देशातील अन्य शहरांमध्ये किंवा गावांमध्ये माणूस नावाचे प्राणीच राहत नाहीत, अथवा असल्यास त्यांच्या जीवनात सुख:दुःख हा प्रकार कधी येतच नाही.

साहजिकच जनसामान्यांच्या वेदनांचा समावेश नसणाऱ्या या मालिकांतील पात्रांच्या भूमिका नाटकी व जगावेगळ्या वाटत असल्यामुळे सामान्य जनता डोळे फाडून या मालिका बघते. त्यामुळे आता नातीगोती टिकवून ठेवण्यास मार्गदर्शक ठरणाऱ्या कुटुंबवत्सल मालिका तयार होणं अत्यावश्यक आहे. कारण पुन्हापुन्हा नात्यांमधील द्वेष, कलह पाहून प्रेक्षकांनाही वीट आलाय. नाती ही कधीही

एकमेकांच्या विरोधात ठाकण्यासाठी नसतात. ती जगण्यासाठी असतात. आई-मुलगी, भाऊ-भावजय, नणंद-भावजय, सासू-सून यास संबंधामध्ये कितीही कटू-गोड प्रसंग उद्‌भवले, तरी संवेदनशील भावनांची जपणूक करून जगणं खरं जीवन आहे.

परंतु आजच्या टी.व्ही. मालिकांच्या इलेक्ट्रॉनिक संस्कारानुसार जीवन जगण्याचा प्रयत्न केल्यास साबणाच्या फेसाप्रमाणे पाण्यावर फक्त शुभ्र, चमकदार बुडबुडे दिसतील, जे क्षणात नाहीसे होतील.

**श्वेता दशरथ डिचोलकर**
१२ वी वाणिज्य,
जोशी-बेडेकर महाविद्यालय, ठाणे

---

(पान नं. ३१ वरून चालू)

### आर्थिक विकासाला राजकीय अडथळे

यात फक्त विशिष्ट समाजाच्या प्रगतीकडे विशेष लक्ष दिले जाते. बाकी समाज आहे तसाच राहतो.

आपल्याकडे आरक्षण, सवलती जातींप्रमाणे मिळतात परंतु अनेक सवर्णांची आर्थिक स्थिती हालाखीची आहे. त्यामुळे आरक्षण जातींप्रमाणे न देता ते आर्थिक पत पाहून द्यावे व समाजाची उन्नती करावी.

राजकारण्यांच्या स्वत:चे खरे करून दाखविण्याच्या वृत्तीने समाज नाहक भरडला जात आहे.

त्यामुळे जर देशाचा आर्थिक विकास करायचा असेल तर देशाला कणखर नि:स्वार्थी दूरदृष्टी ठेवून वागणाऱ्या नेतृत्वाची आवश्यकता आहे. अन्यथा आपला आर्थिक विकास आजच्या सारख्या मंद गतीने चालू राहिल.

**आदिती संग्राम सोमण**
वा. ना. बांदोडकर महाविद्यालय,
ठाणे.

## नोव्हेंबर २००३

### दिन विशेष

१. औद्योगिक सुरक्षा दिन

४. कार्तिकी एकादशी

८. गुरु नानक जयंती
या दिवशी खग्रास चंद्र ग्रहण असून ते भारतात कोठेही संपूर्ण दिसणार नाही.

१५. पंडित जवाहरलाल नेहरू जयंती

१७. लाला लजपतराय जयंती

२०. नामदेव महाराज जयंती

बांदोडकर विज्ञान महाविद्यालयाचे पहिले प्राचार्य व द्रष्टे शिक्षक कै. म.द. नाडकर्णी यांचा जन्म दिवस

२२. संत ज्ञानेश्वर महाराज समाधी उत्सव

२६. रमजान ईद

२८. म. फुले पुण्यतिथी

गुरु तेज बहादुर शहीद दिन.

दि
शा
नियमित
वाचा

आपली मते जाणून घेण्यास आम्ही उत्सुक आहोत.

# परिसर वार्ता

## बांदोडकरच्या ग्रंथालयशास्त्र विभागातर्फे व्याख्यान

बांदोडकर विज्ञान महाविद्यालयाच्या ग्रंथालय व माहितीशास्त्र विभागातर्फे रविवार दि. १२ ऑक्टोबर रोजी जोशी-बेडेकर महाविद्यालयाचे ग्रंथपाल प्रा. नारायण वारसे यांचे 'सार्क' आयोजित विशेष अभ्यासक्रमाचा उपयोग या विषयावर पॉवर पॉइंट प्रेझेंटेशनसह व्याख्यान आयोजित करण्यात आले होते.



कार्यक्रमाचे प्रास्ताविक या विभागाचे प्रमुख व बांदोडकर विज्ञान महाविद्यालयाचे ग्रंथपाल प्रा. मोहन पाठक यांनी केले. सार्कच्या अभ्यासक्रमासाठी संपूर्ण देशातून केवळ दोन ग्रंथपालांची निवड होते. अशी निवड झाल्याबद्दल या विभागातर्फे प्राच्य विद्या अभ्यास संस्थेचे ग्रंथपाल श्री. विश्वनाथ शेंड्ये यांच्या हस्ते वारसे यांचा सत्कार करण्यात आला.

प्रा. वारसे यांनी या अभ्यासक्रमाचे स्वरुप स्पष्ट करुन अभ्यासक्रमाचा प्रत्येक घटकाची माहिती दिली. भविष्यात ग्रंथालय व माहिती क्षेत्रात काम करू इच्छिणारांना या सर्व तंत्रज्ञानाच्या उपयोजनाचे सखोल ज्ञान असायला हवे असे यावेळी त्यांनी सांगितले.

कार्यक्रमास बांदोडकर विज्ञान महाविद्यालयाचे यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठाचे बी. लिब् व एम्. लिब् चे विद्यार्थी, जोशी-बेडेकर महाविद्यालयाचे बी. लिब् चे विद्यार्थी यांच्यासह वि.प्र.मं.च्या तंत्रनिकेतनच्या ग्रंथपाल भारती जोशी, श्री. शिंगार्डे, ज्ञानसाधना महाविद्यालयाचे ग्रंथपाल प्रा. महेश दळवी, एसीलीचे निवृत्त ग्रंथपाल श्री. प्रविण प्रधान आदी मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाचे आयोजन करण्यासाठी श्री. संजय सकपाळ, श्री. ललित, श्री. संदीप कांबळे, श्री. भरत लहाने यांनी विशेष सहकार्य केले.

## तंत्रनिकेतनात माजी विद्यार्थी स्नेहसंमेलन

दि. २/१०/२००३ रोजी विद्याप्रसारक मंडळाच्या तंत्रनिकेतनाच्या माजी विद्यार्थ्यांचे तृतीय स्नेहसंमेलन तंत्रनिकेतनाच्या ड्रॉइंग हॉलमध्ये आयोजित केले होते. स्नेहसंमेलनास १९८९ पासून २००३ पर्यंत उत्तीर्ण झालेले विद्यार्थी उपस्थित होते. या कार्यक्रमात तंत्रनिकेतनाच्या यशस्वी उद्योजक विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला.




डावीकडून सौ. वडेर (विभागप्रमुख ई.पी.एस.) प्राचार्य श्री. मुजुमदार, उपप्राचार्य श्री. नायक

त्यात आशिदा इलेक्ट्रॉनिक्सचे श्री. सुयश कुलकर्णी, एन. के. इंटरप्रायझेसचे श्री. नितिन केळकर, ओमकार इंजिनियर्सचे श्री. नितिन केळुस्कर, प्रोटेक इंजिनिअरींगचे श्री. निपुल गोसालिया, श्री. मंदार कुलकर्णी, श्री. मनोज पांडे यांचा समावेश होता. तंत्रनिकेतनाचे प्राचार्य श्री. मुजुमदार यांनी माजी विद्यार्थ्यांचे स्वागत केले व तंत्रनिकेतनाच्या प्रगतीचा आढावा घेतला. या संदर्भातील एक Presentation माजी विद्यार्थ्यांना दाखविण्यात आले. तंत्रनिकेतनाचे उपप्राचार्य श्री. डी. के नायक यांनी तंत्रनिकेतनाच Future plans ची माहिती विद्यार्थ्यांना दिली.

इलेक्ट्रिकल विभागाच्या प्रमुख प्रा. सौ. वडेर यांनी माजी विद्यार्थ्यांना संघटनेची माहिती करून दिली.

माजी विद्यार्थ्यांचे पुढील स्नेहसंमेलन २६ जानेवारी २००४ रोजी आयोजित होणार आहे.

## रक्तदान शिबीर

दिनांक १ ऑक्टोबर २००३ रोजी विद्याप्रसारक



**उपप्राचार्य श्री. नायक रक्तदान करताना, डावीकडून प्रा. मोहिते-पाटील, श्री. भोरे (शिक्षकेतर कर्मचारी), प्राचार्य सी. जी. मुजुमदार, उपाध्यक्ष श्री. करंदीकर, डॉ. सुहास मोहनालेकर**

मंडळाच्या तंत्रनिकेतनात रक्तदान शिबिर आयोजित करण्यात आले होते. प्राचार्य श्रीयुत एस्. एस्. मुजुमदार व उपप्राचार्य श्रीयुत डी. के. नायक हे यावेळी उपस्थित होते. त्यांच्या उपस्थितीत सकाळी ८ ते दुपारी १ च्या दरम्यान हे शिबीर संपन्न झाले. सर्वप्रथम उपप्राचार्य श्रीयुत डी. के. नायक यांनी रक्तदान केले. या शिबीराला शिक्षक वर्ग, शिक्षकेतर कर्मचारी तसेच विद्यार्थी मित्रांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. २८ विद्यार्थ्यांनी या शिबिरात रक्तदान केले.

ठाणे स्थानिक रुग्णालयाचे डॉक्टर्स व कर्मचारी वर्गाने या शिबिरासाठी आवश्यक ती मदत पुरविली. तंत्रनिकेतनातील जवळ जवळ १०० जणांनी उपस्थित राहून शिबीरास उत्स्फूर्त प्रतिसाद दर्शविला. परंतु, रुग्णालयाची मर्यादा ३० बाटल्यांची असल्याकारणाने सर्व उपस्थित विद्यार्थी वर्गाला या शिबिरात सहभागी होता आले नाही.

२० वर्षांत प्रथमच असे शिबिर तंत्रनिकेतनाच्या आवारात झाले. तृतीय वर्षाचे विद्यार्थी नरेश आर. चौधर (T.Y.I.E.), तुषार डी. खांडेकर (T.Y.I.E.), विनायक उतेकर (T.Y.CH.), समीर हिंगमिरे (T.Y.I.S.) आणि इतर तृतीय वर्षीय विद्यार्थ्यांच्या सहकार्याने प्राध्यापक टी. बी. मोहिते-पाटील यांच्या बहुमूल्य मार्गदर्शनाखाली शिबीर झाले.

रक्ताची कमतरता व रक्तदानाचे महत्व नवीन पिढीच्या अभियंत्याला कळावे यासाठी हे शिबिर आयोजित करण्यात आले होते.

## ग्रंथाशी मैत्री करा - प्रा. दामोदर मोरे

'आळसाशी मैत्री करू नका. तो मित्रासारखा वाटणारा तुमचा शत्रू आहे. ग्रंथाशी मैत्री करा. तुम्ही ग्रंथाचे झालात की ग्रंथ तुमचे होतील आणि तुम्हाला इतके भरभरून देतील की, आयुष्यात तुम्हाला काहीही कमी पडणार नाही. उज्ज्वल ध्येयाचा ध्यास आणि एकाग्रपणे केलेला अभ्यासच

यशाच्या धवल शिखराकडे घेऊन जात असतो.' असे प्रतिपादन मराठी विभागप्रमुख प्रसिद्ध साहित्यिक प्रा. दामोदर मोरे यांनी केले.

जोशी कला व बेडेकर वाणिज्य महाविद्यालयात आयोजित करण्यात आलेल्या गुणगौरव समारंभात ते अध्यक्षपदावरून बोलत होते. तृतीय वर्ष भाषा विषयातील सहा विद्यार्थिनींची मुंबई विद्यापीठाच्या परिक्षेत प्रथम श्रेणी मिळवून महाविद्यालयात इतिहास घडवला. मराठी भाषा विषयाच्या विद्यार्थ्यांचे हे यश निश्चितच नजरेत भरणारे आहे.

दक्षत चव्हाण, प्रगती पाटील, ज्योत्स्ना परब, चेतना खोले, स्मिता वर्वे, सुनीता जगताप या प्रथम श्रेणीत आलेल्या विद्यार्थिनींचा यावेळी उपप्राचार्या शोभा दोशी आणि मराठी विभागप्रमुख प्रा. दामोदर मोरे यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

यावेळी बोलताना उपप्राचार्या शोभा दोशी म्हणाल्या की, उद्याची गोष्ट आजच करा आणि आजची आताच करा. मला विश्वास आहे या वर्षीदेखील मराठी विभागाचे अधिकाधिक विद्यार्थी प्रथम श्रेणीत येतील. 'अभ्यासाच्या वेळेचे व्यवस्थापन' करण्याची सूचना प्रा. अनिल भावड यांनी बोलताना केली तर मिळवलेले यश टिकवणे अत्यंत कठीण असते. तुमचे यश पिवळे पडू देऊ नका. नवे यश मिळवत रहा' असे प्रा. संतोष राणे यांनी सांगितले.

दक्षता चव्हाण, सुनीता जगताप या विद्यार्थिनींनी आपले अनुभव सांगितले. प्रा. संतोष राणे यांनी एक सुंदर कविता सादर केली. विद्यार्थ्यांच्या आग्रहास्तव प्रा. मोरे यांनी 'पापण्यांच्या शिंपल्यातून' ही कविता सुमधूर आवाजात सादर केली. कवितेच्या स्वरसौंदर्याने आणि अर्थमाधुर्याने विद्यार्थ्यांची मने जिंकली. कु. चेतना खोले या विद्यार्थिनीने प्रा. मोरे यांच्या गुणगौरव आणि



**तृतीय वर्ष कला मराठी विषयात प्रथम श्रेणीत आलेल्या विद्यार्थिनी स्मिता वर्वे, जोत्स्ना परब, चेतना खोले, दता चव्हाण, सुनिता जगताप, प्रगती पाटील, प्रा. अनिल भावड, मराठी विभाग प्रमुख प्रा. दामोदर मोरे, उपप्राचार्या शोभा दोशी आणि प्रा. संतोष राणे**

त्यांच्याविषयी कृतज्ञता भाव प्रकट करणारी कविता सादर केली. दीपलता शिंदे या विद्यार्थिनीने कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले. या कार्यक्रमास महाविद्यालयाचे आजी-माजी विद्यार्थी आणि पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### खो - खो साठी पत्रकार परिषद

ठाणे शहराच्या इतिहासात प्रथमच आंतरविद्यापीठ खो-खो स्पर्धा दि. २८ ऑक्टोबर ते ५ नोव्हेंबर २००३ या कालावधीत येथील जोशी-बेडेकर महाविद्यालयाच्या मैदानावर आयोजित करण्यात आल्या. या सामन्यांमध्ये दक्षिण व पश्चिम विभागातील ६३ विद्यापीठाचे पुरुष संघ सहभागी होणार असून सामन्याच्या पहिल्या फेरीत विजयी ठरणाऱ्या एकूण ८ संघांची अंतिम राष्ट्रीय सामन्यासाठी निवड करण्यात येणार आहे. या सामन्याच्या वृत्त संकलनासाठी येणाऱ्या पत्रकारांकरिता सुसज्ज असा पत्रकार कक्ष उभारण्यात आला असून या कक्षाचे उद्‌घाटन मुंबई विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. भालचंद्र मुणगेकर यांच्या हस्ते झाले.

पत्रकार परिषदेस उपस्थित असणाऱ्या पत्रकार व वृत्तवाहिनी प्रतिनिधींना प्राचार्य स. वा. गोखले, डॉ. भालचंद्र मुणगेकर यांनी सामन्यांची माहिती दिली. यावेळी बोलताना डॉ. मुणगेकर यांनी खो खो खेळाचे महत्त्व सांगितले. आमदार माननीय अनंत तरे यांनी ठाण्यात प्रथमच राष्ट्रीय स्तरावरील खो खो स्पर्धा आयोजित होत असल्याबद्दल समाधान व्यक्त करून या खेळाला व स्पर्धेतील सामन्यांना गर्दी करावी असे आवाहन केले. पत्रकार परिषदेचा समारोप माननीय डॉ. वा. ना. बेडेकर यांच्या अध्यक्षीय भाषणाने झाला. परिषदेचे सूत्र संचलन प्रा. अनिल भावड तर आभार प्रदर्शन उपप्राचार्य बडगुजर यांनी केले.

**आंतरविद्यापीठ खो-खो स्पर्धांचे उद्घाटन**



**मुंबई विद्यापीठ व जोशी-बेडेकर महाविद्यालय आयोजित आंतर विद्यापीठ राष्ट्रीय खो-खो स्पर्धेच्या उद्घाटन समारंभात बोलताना ठाण्याच्या महापौर सौ. शारदा राऊत. व्यासपीठावर बसलेले प्राचार्य स.वा. गोखले, मुंबई विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. भालचंद्र मुणगेकर, डॉ. वा. ना. बेडेकर, आमदार श्री. अनंत तरे व इतर मान्यवर**

आंतरविद्यापीठ खो-खो स्पर्धा मुंबई विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. भालचंद्र मुणगेकर यांच्या अध्यक्षतेखाली व ठाण्याच्या महापौर सौ. शारदा राऊत यांच्या हस्ते साऊथ वेस्ट झोन इंटर युनिव्हर्सिटी टुर्नामेंटचे उद्घाटन झाले.

यावेळी ठाणे जिल्हा खो-खो संघटनेचे अध्यक्ष आमदार श्री. अनंत तरे , विद्याप्रसारक मंडळाचे अध्यक्ष डॉ. वा. ना. बेडेकर , प्राचार्य स. वा. गोखले, शारिरिक शिक्षण व खेळ विभागाचे संचालक प्रा. यु. एन. केंद्रे, श्री करंदीकर, प्रा. बंजारी, ठाणे महापालिका स्थायी समितीचे गोपाळ लांडगे, नगरसेवक अनिल साबे, संदीप लेले, सुधारक चव्हाण, भास्कर पाटील, सी. जी. पाटील, उपप्राचार्य बडगुजर, उपप्राचार्या सौ. शोभा जोशी, डॉ. डिसोझा आदी मान्यवर उपसिथत होते.

प्रमुख पाहुणांचे आगमन झाल्यावर लेझीम नृत्य व बँडच्या गजरात त्यांचे स्वागत करण्यात आले. प्रथम आंतरविद्यापीठ संघाच्या ध्वजाचे डॉ. भालचंद्र मुणगेकर यांच्या हस्ते, मुंबई विद्यापीठाच्या ध्वजाचे महापौर सौ. शारदा राऊत यांच्या हस्ते तर विद्याप्रसारक मंडळाच्या ध्वजाचे डॉ. वा. ना. बेडेकर यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले.



**खेळांडूकडून मानवंदना स्वीकारतांना व्यासपीठावरील मान्यवर**

त्या नंतर पाहुण्यांनी देशभरातून आलेल्या सर्व विद्यापीठाच्या संघांकडून मानवंदना स्वीकारली. त्या नंतर

सर्व संघांच्या संघनायकांना शपथ देण्यात आली. प्राचार्य गोखले यांच्या हस्ते मान्यवरांचा सत्कार करण्यात आला.

ठाण्याच्या महापौर सौ. शारदा राऊत यांनी ठाणे शहराला या स्पर्धा आयोजित करण्याचा मान मिळाला याचा सार्थ अभिमान आपल्याला वाटत असल्याचे सांगून आपण स्वतः लहानपणापासून खो-खो खेळत असल्याने या खो-खो महोत्सवाबद्दल आपल्याला विशेष आत्मियता वाटत असल्याचे प्रतिपादन केले.

या वेळी बोलताना कुलगुरु डॉ. भालचंद्र मुणगेकर म्हणाले की, अलिकडच्या काळात मुंबई विद्यापीठाला एखादा राष्ट्रीय स्पर्धेचे आयोजन व यजमानपद मिळण्याचा अतिशय दुर्मिळ मान या खो-खो स्पर्धांच्या निमित्ताने मिळाला आहे. शैक्षणिक कामगिरीबरोबरच आपल्या खेळानाही महत्त्व देणे गरजेचे आहे. क्रिकेटसारख्या विदेशी खेळाला आंतरराष्ट्रीय तसेच आपल्या देशात खूप महत्त्व प्राप्त झाले आहे. खो-खो हा खेळ अतिशय तांत्रिक असा देशी खेळ आहे आणि हा खेळ सर्वसामान्यांना परवडण्यासारखा आहे. त्यामुळे या खेळाला तितकेच महत्त्व मिळाले पाहिजे.



खेळाडूंचा परिचय करून घेताना डॉ. भालचंद्र मुणगेकर



मुंबई विद्यापीठ व जोशी-बेडेकर महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमने आयोजित आंतरविद्यापीठ राष्ट्रीय खो-खो स्पर्धेचे उद्घाटन झाले. पहिल्या दिवशी झालेल्या एका खो-खो सामन्याचे हे क्षणचित्र.

डॉ. भालचंद्र मुणगेकर यांनी सर्व खेळाडूंना मुंबई विद्यापीठाच्या वतीने तर महापौर सौ. शारदा राऊत यांनी ठाणे शहराच्या वतीने व आयोजकांना हार्दिक शुभेच्छा दिल्या. यावेळी देशभरातून आलेल्या खो-खो संघाचे संचलन म्हणजे राष्ट्रीय एकात्मतेचे मनोहारी प्रतिबिंब ठरले. या समारंभाचे औचित्य साधून या महाविद्यालयाचे दोन माजी विद्यार्थी अमिता संघवी आणि कॅप्टन चंद्रशेखर बारळकर यांनी आपापल्या क्षेत्रात नेत्रदिपक कामगिरी बजावल्याबद्दल त्यांचा सत्कार महापौर सौ. शारदा राऊत यांच्या हस्ते विशेष सत्कार करण्यात आला. प्रणव पटवर्धन या लहान मुलाने सादर केलेला अभंग आणि सुंदर कोळी नृत्य यावेळी सादर झालेल्या सांस्कृतिक कार्यक्रमाचे वैशिष्ठ्य ठरले. उपप्राचार्या शोभा दोशी यांनी उपस्थितांचे आभार मानले.

प्राचार्य गोखले यांनी या मोठ्या राष्ट्रीय स्तरावरील खो-खो स्पर्धा आयोजित करण्याची जबाबदारी मुंबई विद्यापीठाने जोशी-बेडेकर महाविद्यालयावर सोपवून जो

विश्वास दाखवला त्याबद्दल कृतज्ञता व्यक्त केली. डॉ. वा.ना. बेडेकरांनी माझे स्वतः चे पुण्य खर्ची होऊन या स्पर्धा यशस्वी होवोत असे मनोगत व्यक्त केले.

ठाणे जिल्हा खो-खो संघटनचे कार्यकारी अध्यक्ष आमदार श्री. अनंत तरे यांनी सर्व खेळाडूंना हार्दिक शुभेच्छा दिल्या आणि खो-खो आणि कबड्डी सारख्या देशी खेळांनाही प्रोत्साहन व प्राधान्य मिळाले पाहिजे असे प्रतिपादन केले. या वेळी या स्पर्धेसाठी अनेक मान्यवरांचे शुभेच्छापर संदेश आले होते. त्याबद्दल आयोजकांनी कृतज्ञता व्यक्त केली. महाराष्ट्राचे राज्यपाल माननीय श्री. मोहम्मद फजल यांचा संदेश डॉ. डिसोझा यांनी वाचून दाखवला.

प्रमुख पाहुण्यांचे हस्ते श्रीफळ वाढवून आणि नाणेफेक करून तसेच खेळाडूंची ओळख करून एकाच वेळी ४ मैदानावर खो-खो च्या सामन्यांना सुरुवात झाली. ठाणे शहराच्या इतिहासात प्रथमच या आंतरविद्यापीठ खो-खो स्पर्धा दि. २८ ऑक्टोबर ते ५ नोव्हेंबर २००३ या कालावधीत येथील जोशी-बेडेकर महाविद्यालयाच्या मैदानावर आयोजित करण्यात आल्या आहेत. या सामन्यामध्ये दक्षिण व पश्चिम विभागातील ६३ विद्यापीठाचे पुरुष संघ सहभागी होणार असून सामन्याच्या पहिल्या फेरीत विजयी ८ संघाची अंतिम राष्ट्रीय सामन्यासाठी निवड होणार आहे.

•••



मा. प्रा. मोहन पाठक

दिशाचा मी नियमीत वाचक आहे. दिशा मध्ये आपण अत्यंत चांगले साहित्य देता. यावरोबरच इंटरनेट क्रांती संबंधी व मुख्यत: माहिती तंत्रज्ञानातून नव्यानेच निर्माण झालेल्या विषयांवर लेख असावेत असे वाटते. इंटरनेट संदर्भात हॅकिंग, सायबर क्राइम, इ सिक्युरिटी, इन्फर्मेशन सिक्युरिटी असे अनेक नवीन विषय विचारात पडणारे आहेत. दिशासारख्या उत्तम नियतकालिकाने या विषयांवरील लेख द्यावेत ही विनंती.

कळावे,

आपला,

श्रीकृष्ण बोडस,
हायकोर्ट रोड, अमरावती